मा. श्री. आमदार प्रशांत ठाकूर अभीष्टचिंतन विशेष..

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १९
www.ramprahar.com

मंगळवार ५ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



## एक उत्तम नेतृत्व

राजकारण हे केवळ सत्तेचे माध्यम नसते, तर तो सेवा, संकल्प आणि सामाजिक परिवर्तनाचा एक सशक्त मंच असतो. या भूमिकेला सार्थ ठरणाऱ्या आणि निस्वार्थीपणे जनतेच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या नेत्यांमध्ये आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर यांचे नाव आदराने घ्यावे लागेल. वाढदिवसाच्या औचित्याने त्यांच्या कार्याचा मागोवा घेणे ही एक सन्मानाची गोष्ट आहे...

**–आमदार निरंजन डावखरे, कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ**

सविस्तर पान ६ वर..

## जनमानसातील आमदार

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार असा नावलौकिक असणारे आमदार प्रशांतदादा ठाकूर नावाप्रमाणेच हुशार, शांत स्वभावाचे, संयमी आणि गोरगरीबांच्या मदतीला तत्पर असणारे नेतृत्व आहे. नगराध्यक्ष ते आमदार हा प्रवास करत असताना त्यांनी जनमानसात राहून प्रचंड कामे केली. त्यांनी केलेले कार्य पाहून रायगड जिल्ह्यातील युवकांचे ते प्रेरणास्थान बनलेत...

**–आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे,**
**कोकण विभाग शिक्षक मतदारसंघ**

सविस्तर पान ६ वर..

- कार्यकर्त्यांना बळ देणारे नेतृत्व
- लोकसेवेचा तपस्वी
- राजकारण, समाजकारण आणि संस्कृतीचा संगम
- समाजसेवी लोकप्रतिनिधी
- गोरगरिबांचा आधारवड

पान ६ व ८ वर..

## शुभेच्छा संदेश...

**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

जा.क्र/मु.मं.स/ज.क./२३६/२०२५
दि. ३० जुलै, २०२५

प्रिय प्रशांत जी,

वाढदिवसानिमित्त आपले मन:पूर्वक अभिष्टचिंतन!

पनवेल विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करत असताना आपण दाखवलेला विकासात्मक दृष्टीकोन, समाजाभिमुख उपक्रम आणि लोकसहभागाला दिलेले प्राधान्य महत्त्वपूर्ण आहे. आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मतदारसंघाचा चेहरा बदलताना दिसत आहे, पनवेल परिसरात शहरी तसेच ग्रामीण विकासाला नवे परिमाण मिळताना दिसत आहे. सोबतच शहराचा विकास झपाट्याने होत असताना पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणासारख्या मोहिमेच्या माध्यमातून आपण घेतलेला पुढाकारही प्रशंसनीय आहे.

सर्वसामान्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठीची आपली तळमळ आणि त्यासाठी आपण करत असलेला पाठपुरावा जनतेशी असलेली निष्ठा दर्शवणारा आहे. लोकप्रतिनिधींची दिनचर्या अत्यंत धावपळीची असते. मतदारसंघांची काळजी वाहत असताना आपण आपल्या आरोग्याचीही काळजी घ्याल, अशी आशा आहे.

आपणास निरामयी दिर्घायुष्य लाभो व आपल्या सर्व मनोकामना पूर्ण होवो या सदिच्छेसह आपणास पुन:श्च वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.!

(देवेंद्र फडणवीस)

प्रति,
श्री प्रशांत ठाकूर,
आमदार, पनवेल विधानसभा मतदारसंघ,
पनवेल

दुरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in,
वेब साईट : www.maharashtra.gov.in

---

**एकनाथ संभाजी शिंदे**
उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
29 JUL 2025

सर्वप्रथम वाढदिवसाच्या आपणास मन:पूर्वक शुभेच्छा.

आपण एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी मिळाल्यावर मतदारांच्या अडचणी समजून त्या तातडीने सोडवण्यास आपण नेहमीच प्राधान्य दिले आहे. कामातील चिकाटी व प्रामाणिकपणाच्या जोरावर नागरिकांच्या मनात आपण वेगळी छाप टाकली आहे.

मतदारसंघाच्या विकासासाठी नवनवीन संकल्पनांच्या माध्यमातून आपण काम केले आहे. एखादे काम पूर्णत्वास नेण्यासाठीची आपली चिकाटी व जिद्द मी पाहिली आहे. मनमिळावू स्वभाव व कामाप्रती असलेली निष्ठा यामुळेच आपण जनसामान्यांच्या मनात आदराचे स्थान मिळविले आहे. ही कौतुकाची बाब आहे. आपल्या या कार्यामुळे मतदारसंघातील विकासाची गती आणखी वाढेल, असा विश्वास आहे.

आपला हा यशस्वी राजकीय प्रवास असाच निरंतर सुरु राहो. आपणास निरोगी दीर्घायुष्य लाभो या मन:पूर्वक शुभेच्छा !

(एकनाथ संभाजी शिंदे)

प्रति,
श्री. प्रशांत ठाकूर,
आमदार, भारतीय जनता पार्टी,
पनवेल.

कार्यालय : ६वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दुरध्वनी : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०९
ई-मेल : dcm@maharashtra.gov.in, संकेत स्थळ : www.maharashtra.gov.in

---

**उप मुख्यमंत्री**
महाराष्ट्र राज्य

दि. ०४ ऑगस्ट, २०२५.

### शुभेच्छा

आपल्या वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा!

आपण पनवेल विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना सामाजिक जाणिवेचे भान ठेवत लोकसेवेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहात. लोकशाही व्यवस्थेत जनतेचा प्रतिनिधी म्हणून कार्य करताना, लोकहिताला केंद्रस्थानी ठेवण्याची आपली भूमिका उल्लेखनीय आहे.


आपले वडील, श्री. रामशेठ ठाकूर यांनी पनवेल परिसराच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचा वारसा आपण समर्थपणे पुढे नेत आहात, ही बाब निश्चितच प्रशंसनीय आहे.

आपल्याला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि पुढील वाटचालीत जनतेच्या अपेक्षांना सार्थ ठरवणारे कार्य करण्याची ऊर्जा सदैव लाभो, हीच मन:पूर्वक सदिच्छा!

(अजित पवार)

**प्रति,**
श्री. प्रशांतजी ठाकूर,
आमदार, पनवेल विधानसभा मतदारसंघ.



# जबाबदार आणि शिस्तप्रिय व्हा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

### सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएससी स्कूलचा तृतीय इन्वेस्टीचर्स समारंभ





**उलवे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल येथे तृतीय इन्वेस्टीचर समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते माजी खासदार व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रामशेठ ठाकूर होते. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना जबाबदार आणि शिस्तप्रिय व्हावे, असा मोलाचा सल्ला आपल्या मनोगतामध्ये दिला.

प्रमुख पाहुणे म्हणून गिरीश ठाकरे साहेब (एसीपी नवी मुंबई पोलीस), पनवेल महापालिका माजी सभागृह नेते व शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे विद्यमान चेअरमन परेश रामशेठ ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत, मॅनेजिंग कौन्सील सदस्य जोश्ना ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागाचे असिस्टंट इन्स्पेक्टर विलासराव जगताप सर यांच्यासोबत एलआरटीपीएसचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, एलआरटीइ एमएसच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे व मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, यांच्यासमवेत विद्यार्थी पालक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी इत्यादी लोक उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली यानंतर विद्यार्थ्यांनी रयत गीत व स्वागत गीत गाऊन उपस्थितांची मने जिंकली.

यानंतर स्वागत नृत्य सादर करण्यात आले व इन्वेस्टीचर कार्यक्रमास सुरुवात झाली क्रीडाशिक्षक संग्राम फोफेरकर, संगीत शिक्षक हर्षल फडके यांच्या प्रशिक्षणातून बँड पथकामार्फत विद्यार्थी संचलन करून स्टेजवर आले मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शपथ स्लॅश व ब्याच देण्यात आले.

यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. यानंतर स्कूलचे चेअरमन परेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात कसे नाव कमवण्यासाठी कशी मदत होईल याबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी असलेल्या माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना जबाबदारी, शिस्तचे महत्त्व पटवून सांगितले. अशाप्रकारे राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली व कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात झाला.

## विद्यार्थी गुणगौरव आणि छत्री वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून धाकटा खांदा येथील रत्नदिप स्पोर्ट्स क्लबच्या वतीने मंगळवारी (दि.५) सकाळी ११ वाजता इयत्ता दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच शाळेतील विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप कार्यक्रम होणार आहे.

श्री. गणेश विद्या मंदिर, प्राथमिक शाळा क्रमांक ६ धाकटा खांदा येथे होणाऱ्या या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून या कार्यक्रमाचा लाभ ज्येष्ठ नागरिक व विदयार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती मनोहर म्हात्रे यांनी केले आहे.

## पनवेल महापालिकेत लोकशाही दिन

### नागरिकांच्या तक्रारींचे निवारण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सोमवारी (दि.४) आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीत नागरी सेवा सुविधा, नगरविकास विभाग, प्रभाग ब अशा विविध विभागाचे चार अर्ज दाखल झाले होते, या वेळी नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत संबधित विभागास सूचना देण्यात आल्या. या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, इमारत निरीक्षक राजेश कर्डिले, घनकचरा विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.

## ओवे पेठ येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या वह्यांचे वाटप करून आपले हस्ताक्षर सुधारावे तसेच शिक्षणामध्ये चांगली प्रगती करून आपले भविष्य उज्वल करावे, असे आवाहन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी ओवे पेठ येथे शैक्षणिक साहित्यांच्या वाटपावेळी केले.

गेल्या अनेक वर्षांपासून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हे गरजू विद्यर्थ्यांना मदत करण्यातचे काम करत आहेत. त्यानुसार दरवर्षी मंडळाच्या वतीने विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जात आहेत. त्याअंतर्गत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या आणि दप्तर वाटपाचा कार्यक्रम सोमवारी आयोजीत करण्यात आला होता. या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उत्तर मंडळाचे उपाध्यक्ष प्रभाकर जोशी, चिटणीस सचिन वास्कर, कामगार आघाडीचे खारघर मंडळ अध्यक्ष जयदास तेलवणे, अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस ईरशाद शेख, नीशा नायर, प्रीया मोहिते यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते.



## मार्जिन मनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांसाठी 'मार्जिन मनी' उपलब्ध करून देण्याची योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुंबई उपनगरचे सहायक आयुक्त समाज कल्याण रविकिरण पाटील यांनी केले आहे.

यासंदर्भात विभागाच्या ८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयात योजनेच्या अटी व शर्ती, आवश्यक कागदपत्रांची माहिती व प्रस्ताव सादर करण्याची कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आलेली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर. सी. मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई – ४०००७१ या पत्त्यावर अर्ज करावा. कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२२–२५२२२०२३ हा असून ई–मेल आय डी acswomumbaisubgmail.com हा असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## पनवेल पत्रकार विकास मंचतर्फे मुलींसाठी समुपदेशन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने आज (दि. ४) पनवेलच्या पीर करम अली शहा उर्दू प्राथमिक शाळेतील मुलींना गुड टच – बॅड टच या अत्यंत संवेदनशील विषयावरती समुपदेशन करण्यात आले. माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे आणि सायकॉलॉजिस्ट अनिशा कोल्हापुरे या दोन निष्णात वक्त्यांनी मुलींना मार्गदर्शन केले. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष मंदार दोंदे यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे यांच्या माध्यमातून आजपर्यंत तब्बल ७० हजार विद्यार्थिनींना गुड टच – बॅड टच तसेच मुलींच्या लैंगिक समस्या, करियर कौन्सिलिंग या विषयावर समुपदेशन करण्यात आले आहे. तब्बल १४२ विद्यार्थिनींनी या वेळी तज्ञांसोबत संवाद साधला.

सल्लागार माधव पाटील यांनी या वेळी मंदार दोंदे यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच एका अत्यंत गरज असलेल्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. मुख्याध्यापिका नाझीया सायरा युसुफ दळवी यांनी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचातील उपस्थित सदस्यांचे मनः पूर्वक स्वागत केले.

पनवेल तालुका पत्रकार मंचाच्या वतीने यावेळी उपस्थित सर्व मुलींना हायजिन किट देण्यात आले. या कार्यक्रमाला माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे, मंचाचे सल्लागार माधव पाटील, अध्यक्ष मंदार दोंदे, सल्लागार विवेक मोरेश्वर पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, दीपक घोसाळकर,प्रवीण मोहोकर,राजू गाडे, जॉन्सन जॉर्ज, मुख्याध्यापिका नाझीया सायरा युसुफ दळवी,समन्वयक काझी सर, पीर करम अली शहा उर्दू माध्यम प्राथमिक शाळेतील शिक्षक वृंद यांची प्रमुख उपस्थिती होती.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पोस्टर बनवण्याची स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.४) विज्ञान संघटनेतर्फे पोस्टर बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले होते. या उपक्रमाचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता व कलात्मकता वाढवणे तसेच सामाजिक, शैक्षणिक किंवा पर्यावरणासंबंधित विषयांवर जनजागृती करणे हा होता.

या उपक्रमाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ पनवेल येथील गणित विभागाच्या सहयोगी प्रा. डॉ. जयश्री सक्सेना यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत २४ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला तसेच विविध शास्त्रीय संकल्पनांवर आधारित आकर्षक आणि माहितीपूर्ण पोस्टर विद्यार्थ्यांनी सादर केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे होत्या.

आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे समन्वयक विज्ञान संघटना यांनी केले तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विज्ञान संघटनेतील सर्व सदस्य आणि विद्यार्थी, कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## उरण महाविद्यालयात कर्मचारी विकास कार्यशाळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने आनंद उत्सव या विषयावर कर्मचारी विकास कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या कार्यशाळेत आर्ट ऑफ लिविंग सेंटर,उरण येथील शिक्षिका प्रेरणा पाटील उपस्थित होत्या. प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी आनंदी जगण्याचा मार्ग याविषयी मार्गदर्शन केले. प्रेरणा पाटील यांनी प्राणायाम व मेडिटेशनचे प्रात्यक्षिक घेतले तसेच आनंदी जगण्याविषयीच्या पद्धती सर्वांसमोर विशद केल्या.

कार्यक्रमाचे आभार डॉ. ए. आर. चव्हाण यांनी मानले तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. कार्यशाळेत महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**पनवेल :** ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी यांची कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेलच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल रायगड प्रेस क्लब संलग्न पनवेल तालुका प्रेस क्लबतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे, उपाध्यक्ष तृप्ती पालकर, खजिनदार राकेश पितळे, सल्लागार संजय कदम, सुमंत नलावडे, अनिल भोळे, वर्षा कुलकर्णी, प्रतिक वेदपाठक, लालचंद यादव आदी उपस्थित होते.

## श्रावण मासानिमित्त भिमाशंकर ट्रेक पदयात्रा

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील शिवभक्तांचे गाव म्हणून ओळखले जाणाऱ्या आवरे येथील सोमवार भोश्रानाथ आरती मंडळाच्या वतीने यंदा आयोजित आलेल्या शिवभक्तांच्या १५व्या श्रावणी भिमाशंकर ट्रेक पदयात्रेत ६० तरुणांनी सहभाग घेतला होता.

श्रावण महिन्यात २०१०पासून आवरे शिवभक्त प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असलेले कौशिक मधुकर ठाकूर यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या पदयात्रेत आवरे गावाबरोबर उरण तालुक्यातील इतर गावातील अनेक तरुण सहभागी झाले होते.

अवघड अशा वाटेतून चालताना वाटसरूच्या पायाला किती त्रास होत असला तरी शिवनामस्मरण व निसर्गाच्या सानिध्यातून चालतांना भिमाशंकर तिर्थक्षेत्राकडे जाण्याचा उत्साह निर्माण होतो. १४ किलोमीटर अंतर असलेल्या किचकट ट्रेकर्स मार्गांवरून कर्जत तालुक्यातील खांडस येथील डोंगरातून तीर्थक्षेत्र भिमाशंकरकडे मार्गस्थ होण्यासाठी सहा ते साडेसहा तासांचा अवधी लागतो. येतांना उतार असल्याने त्याहून काही कमी अवधीत माघारी येता येते, अशी ही २ ते ३ ऑगस्टची पदयात्रा पूर्णत्वास नेली.

या पदयात्रेत तानभूक हरपत उरण, पनवेल, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, परिसरातील शिवभक्त दरवर्षी श्रावण महिन्यातील प्रत्येक साप्ताहाच्या दिवसात या भिमाशंकरच्या डोंगरातील पायवाटेतून शेकडो महिला तरुण भावनिक होऊन शिवशंकराच्या दर्शनासाठी येणे पसंत करीत आहेत.

या यंदाच्या पदयात्रेचे आयोजन ही पदयात्रा सुरक्षितरित्या पार पाडण्यासाठी आवरे येथील शिवभक्त कौशिक ठाकूर यांच्यासह हितेंद्र म्हात्रे, श्रेयस गावंड, महेश गावंड, संदीप गावंड, सुरेश भोईर, गणेशप्रसाद गावंड, तुषार म्हात्रे, सुजित ठाकूर, समर्थ म्हात्रे,बल्लू म्हात्रे, शंकर म्हात्रे, निवृत्ती म्हात्रे, लोचन भोईर यांनी मेहनत घेतली. यंदाच्या पदयात्रेत मनोज पाटील, प्रसाद फोफेरकर, सदाशिव पाटील, प्रकाश ठाकूर, तेजस म्हात्रे नव्याने सहभागी झाले होते.




॥ भावपुर्ण श्रध्दांजली ॥



चंदनापरी देहझिजवला,
कष्टातून संसार फुलवला,
आता उरली नाही साथ आम्हाला,
तुमची आठवण येते क्षणाक्षणाला...

✲ दशक्रिया विधी ✲
सोमवार दिनांक ११.०८.२०२५ रोजी
श्री.क्षेत्र कराडे खुर्द येथे होणार असून,

✲ उत्तरकार्य ✲
गुरुवार दिनांक १४.०८.२०२५ रोजी
राहत्या घरी मु.कासप येथे होणार आहेत.

कै.श्री.भानुदास सदाशिव माळी
( मा.उपसरपंच ग्रु.ग्रा.पं. कराडे खुर्द )
वार-शनिवार दि ०२.०८.२०२५ रोजी देवाज्ञा झाली.
ईश्वर सत्तेपुढे इलाज नाही. त्यांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो, हि ईश्वर चरणी प्रार्थना.

आपले दुःखी
श्री.सदाशिव विठ्ठल माळी ( वडील ) कु. रुचिल भानुदास माळी (मुलगा )
श्री. सुभाष सदाशिव माळी ( भाऊ ) श्री. सुनिल सदाशिव माळी ( भाऊ )
श्री. अनिल सदाशिव माळी ( भाऊ )

✲ शोकाकुल ✲ समस्त माळी परिवार व ग्रामस्थ मंडळ कासप

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १९
www.ramprahar.com
मंगळवार ५ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कशेणे गावात बिबट्या पुन्हा सीसीटीव्हीत कैद/४
आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम/५
लाखोंच्या मोबाईल चोरीप्रकरणी तीन जणांना अटक/७

## पायाभूत प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण व्हायला हवेत -मुख्यमंत्री



**मुंबई :** यापुढे पायाभूत प्रकल्प वर्षानुवर्षे चालू न राहता ते हाती घेतल्यानंतर तीन वर्षांत पूर्णत्वास यायला हवेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. ४) वॉर रूमच्या बैठकीत दिले. मुख्यमंत्र्यांनी विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्या वेळी ते बोलत होते. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. तर दूरदृष्यप्रणालीद्वारे विविध विभागांचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपल्याकडे तंत्रज्ञान अद्ययावत आहे. त्यामुळे कमी कालावधीत प्रकल्प पूर्ण व्हायला हवेत.



# कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्रंथतुला

## ■ पुस्तकांचे जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना आधुनिक सुविधा मिळण्यासाठी भारतीय जनता पक्ष काम करत असून अधिकाधिक सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी कळंबोलीमध्ये भव्य ग्रंथतुला आणि मंगळागौर कार्यक्रमावेळी केले, तर या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थिती लाभलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही कार्यक्रमांचे कौतुक करून पुस्तकांचे जीवनात असलेले अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवण्याच्या केलेल्या सूचनेनुसार कळंबोली भाजपच्या वतीने त्यांची ग्रंथतुला करण्यात आली तसेच महिलांसाठी मंगळागौरीचे आयोजन से. ११ येथील आई माता मंदिर हॉलमध्ये करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस चारुशीला घरत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोज भुजबळ, बबन मुकादम, तेजस कांडपिळे, राजू शर्मा, कळंबोली माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रमिला पाटील, मोनिका महानवर, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, वर्षा प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते अरुण पाटील, संदीप म्हात्रे, भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष अशोक मोटे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष प्रिया मुकादम, उपाध्यक्ष संदीप भगत, सुनील ढेबरे, जोहेब पटेल, विनोद बोरसे, राजेंद्र बागल, केशव यादव, मनीषा निकम, सुनीता हिरवळे, सरस्वती काथारा, अपर्णा सरोज, ज्येष्ठ नेते गुरूनाथ ठाकूर, प्रभाग अध्यक्ष घनश्याम शर्मा, प्रकाश शेलार, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, शहराध्यक्ष गौरव पवार, युवा नेता अमर ठाकूर, दिलीप बिष्ट आदी उपस्थित होते.

# ‘स्थानिक’ निवडणुकांचा मार्ग मोकळा

### नवीन प्रभाग रचना, ओबीसी आरक्षणाविरोधातील याचिका फेटाळल्या



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नवीन प्रभाग रचना आणि ओबीसी आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात २७ टक्के ओबीसी आरक्षणासह नव्या प्रभाग रचनेनुसार महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका घेण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

ओबीसी आरक्षण आणि प्रभाग रचनेविरोधातील याचिकांवर सोमवारी (दि. ४) सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नवीन प्रभाग रचना की जुनी प्रभाग रचना असा वाद झाला होता. महायुती सरकारने आधी प्रभाग रचना बदलली होती. त्यात मविआ सरकारने फेरबदल केले. त्यानंतर पुन्हा एकनाथ शिंदेंचे सरकार आल्यानंतर प्रभाग रचनेत बदल पहायला मिळाले. लातूर जिल्ह्यातील औसा नगरपंचायतीच्या निगडीत एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्यात ११ मार्च २०२२पूर्वी जी प्रभाग रचना होती, त्यानुसार निवडणुका घेण्यात याव्यात अशी मागणी होती.

या सुनावणीत न्यायालयाने सांगितले की, वॉर्ड (प्रभाग) रचना ठरवण्याचा अधिकार पूर्णपणे राज्य सरकारचा आहे. सरकारने ठरवलेल्या प्रभाग रचनेनुसारच पुढील निवडणुका घेतल्या जातील. सोबतच २७ टक्के ओबीसी आरक्षणाला आव्हान देण्यात आले होते. त्यावर न्यायालयाने म्हटले की, पूर्वीच्या आरक्षणासह निवडणुका घेण्यास आम्ही आधीच परवानगी दिली आहे. त्यामुळे आता निवडणुकांची प्रक्रिया सुरू करण्यास अडथळा राहिलेला नाही.

राज्यात अनेक महानगरपालिका, नगर परिषदा आणि नगरपंचायतींमध्ये नवीन प्रभाग रचना लागू करून निवडणुकीची तयारी सुरू झाली होती, मात्र नव्या रचनेला विरोध करत काही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या. त्यामुळे निवडणुकीची प्रक्रिया थांबवावी लागली होती. आता न्यायालयाने या सर्व याचिका फेटाळल्याने लवकरच निवडणुका जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त

# पनवेलमध्ये रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा

## भरघोस रकमेची पारितोषिके; सर्वोत्कृष्ट भजनी मंडळाला ५१ हजार रुपये बक्षीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने २३ व २४ ऑगस्ट रोजी रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा पनवेलमध्ये आयोजित करण्यात आली आहे.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा घेण्यात येत आहे.

पनवेल शहरातील मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणारी जिल्हास्तरीय भजन स्पर्धा पुरुष खुला गट आणि महिला खुला गट अशा दोन गटात होणार असून प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट आहे.

स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक सात हजार रुपये तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी सात हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

भजन स्पर्धा प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा दोन टप्प्यात होणार असून प्राथमिक फेरी ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येणार आहे. प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या सर्वोत्तम पुरुष १५ व महिला १५ स्पर्धक भजन मंडळांना अंतिम फेरीसाठी आमंत्रित करण्यात येईल.

प्राथमिक फेरीत भाग घेण्यासाठी २ ते ३ मिनिटांचा साउंड सिस्टिम न वापरता शुटींग केलेला नॉन एडिटेड व्हिडीओ ९१६७४७४५०७ या नंबरवर व्हॉट्सअॅप करावा तसेच हा व्हिडीओ आणि मंडळाची माहिती अर्थात मंडळाचे नाव, सहभागी कलाकारांची नावे, भजन स्पर्धेच्या किमान सात दिवस अगोदर पाठवावी.

अंतिम फेरीत निवड झाल्यावर प्रत्यक्ष सादरीकरण करताना मुख्य गायक-वादकांसह कमीत कमी सहा जणांचा आणि जास्तीत जास्त १२ जणांचा समावेश असावा. अंतिम फेरीत भजन सादरीकरणासाठी २० मिनिटांचा निर्धारित वेळ असणार आहे. त्यामध्ये श्लोक, भजन, एक अभंग आणि एक गौळण सादर करणे आवश्यक असणार आहे. सादरीकरणासाठी घेतलेले अभंग आणि गौळण हे संताचेच असावेत. (रचलेले अभंग, स्वरचित काव्य, गौळण, भक्तिगीत ग्राह्य नाहीत) तसेच अभंग सादरीकरण करताना फिल्मी चालीत अभंग गाऊ नये. **(पान ४ वर..)**

## निवडक

### झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन



**नवी दिल्ली :** झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री शिबू सोरेन यांचे सोमवारी (दि. ४) प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे ते वडील होत. जुलैमध्ये त्यांना किडनीच्या विकारामुळे रुग्णालयात भरती करण्यात आले होते. दिल्लीच्या गंगाराम हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

### गृहमंत्री अमित शाह आज करणार मोठा विक्रम

**नवी दिल्ली :** देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्यासाठी ५ ऑगस्ट २०२५ हा दिवस खास असणार आहे, कारण ते या दिवशी देशाच्या गृहमंत्रिपदी सर्वाधिक काळ राहणारे ते पहिले व्यक्ती बनणार आहेत. भाजपचेच ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचा रेकॉर्ड शाह मोडणार आहेत. सर्वाधिक काळ देशाचे गृहमंत्री म्हणून राहण्याचा विक्रम अडवाणी यांच्या नावे आहे. ते सहा वर्ष ६४ दिवस देशाचे गृहमंत्री होते. त्यानंतर आता अमित शाह यांचे नाव सर्वात वर असणार आहे. मंगळवारी ते नवा इतिहास रचतील.

## रक्षाबंधनानिमित्त राख्यांनी बाजारपेठ सजली

**पनवेल : वार्ताहर**

भावा-बहिणीचे नाते दृढ करणारा रक्षाबंधन सण जवळ आल्यामुळे बाजारपेठेतील दुकाने राख्यांनी गजबजली आहेत. विविध प्रकारच्या राख्या बाजारात उपलब्ध आहेत. यामध्ये ज्वेलरीचा स्टायलिश लूक असलेल्या राख्या यंदा लक्ष वेधून घेत आहेत.



किराणा दुकानापासून ते विविध ठिकाणी राख्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. यात २५ रुपयांच्या साध्या राखीपासून ते दोन हजार रुपयांपर्यंतचे पर्याय उपलब्ध आहेत. ऑनलाइन खरेदीचा पर्यायही खुला असून राखीसोबत मिठाई व इतर भेटवस्तूचे पॅकेज खरेदीसही लोक पसंती देत आहेत.

रक्षाबंधनासाठी आकर्षक राख्या बाजारात उपलब्ध आहेत. लहान मुलांना कार्टूनचे चित्र असलेल्या राख्यांसह ब्रेसलेट, पर्ल, चंदन, डिझायनर, जरदोसी, सीड्रोड, डायमंड, खुभराखी, रुद्राक्ष, चंदन व मौल्यवान खडे असलेल्या राख्यांचीही विक्री केली जात आहे. पूर्वी आकाराने मोठ्या राख्यांना ग्राहकांची पसंती मिळत होती, परंतु आता आकाराने लहान व स्टायलिश राख्यांना मागणी आहे.

सध्या राख्यांचा सरासरी भाव साधी राखी २५ ते १००, कुंदन वर्क ३० ते १६०, भोती राखी २० ते ८०, कपल राखी ३० ते १२०, सोने-चांदी, लुबा राशी ५०० ते २००० असे असून ऑनलाईन खरेदीमध्ये २५ रुपयांपासून ते १०० रुपयांपासून दोन हजार व त्याहीपेक्षा जास्त किमतीच्या राख्या उपलब्ध होत आहेत तसेच दूरच्या शहरात राहणाऱ्या भावासाठी कुरिअरने राखी पाठविणेही शक्य होत असून बजेटप्रमाणे पर्याय उपलब्ध आहेत. एकंदर राख्या विक्रीच्या व्यवसायातून मोठी उलाढाल होण्याची शक्यता आहे.

# ओव्हल कसोटीत भारताचा रोमांचक विजय

## मालिका बरोबरीत; दुसऱ्या डावात सिराजचे पाच बळी

**लंडन : वृत्तसंस्था**


ओव्हल येथे खेळवण्यात आलेल्या पाचव्या आणि अखेरच्या कसोटी सामन्यात भारताने इंग्लंडवर सहा धावांनी रोमहर्षक विजय मिळवला आहे. भारताने विजयासाठी ३७४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संपूर्ण संघ ३६७ धावांवर सर्वबाद झाला. कसोटी कारकिर्दीत पाचव्यांदा पाच बळी घेण्याचा पराक्रम करत सिराजने भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयासह भारताने पाच सामन्यांची अँडरसन-तेंडुलकर चषक मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवली.



सामन्याच्या अंतिम दिवशी विजयासाठी इंग्लंडला केवळ ३५ धावांची आवश्यकता होती, मात्र दिवसाच्या सुरुवातीलाच मोहम्मद सिराजने केलेल्या दुहेरी आघाताने सामन्याचे पारडे भारताच्या बाजूने झुकवले. दुसऱ्या बाजूने प्रसिद्ध कृष्णानेही अचूक यॉर्करवर टंगला त्रिफळाचीत करून भारताच्या आशा पल्लवित ठेवल्या. इंग्लंडच्या शेपूटच्या फलंदाजांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण सिराजच्या भेदक माऱ्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. ॲटकिन्सनने आक्रमक फटकेबाजी करण्याचा प्रयत्न केला. अखेर याच प्रयत्नात तो आपली विकेट गमावून बसला आणि भारताच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला.

### डब्ल्यूटीसी गुणतालिकेत बदल

ओव्हल कसोटीतील विजयामुळे भारताला जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) गुणतालिकेतही मोठा लाभ झाला आहे. भारतीय संघाने एका स्थानाची प्रगती करत तिसरे स्थान गाठले आहे, तर इंग्लंडची चौथ्या स्थानी घसरण झाली आहे. ओव्हल कसोटीपूर्वी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत इंग्लंड तिसऱ्या आणि भारत चौथ्या स्थानावर होता. आता दोन्ही संघांच्या स्थानांमध्ये अदलाबदल झाली आहे.



## संपादकीय

# जनभावनेचा दबाव

नांदणीच्या मठातील महादेवी हत्तीणीसंदर्भात धार्मिक श्रद्धेसोबतच लोकांच्या भावनाही जोडलेल्या आहेत. त्यामुळेच या पेचात न्यायालयीन निकाल व जनभावना या दोन्हींचा सन्मान राखण्याची कसरत सरकारला करावी लागेल असे दिसते आहे.

**गेले अनेक दिवस कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील नांदणी येथील जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी मठातील महादेवी (माधुरी) हत्तीण चर्चेत आहे. अनेक शतकांपासून हा मठ तेथे असल्याचे सांगितले जाते. प्रकृतीच्या व देखभालीच्या कारणावरून या मठातून गुजरातमधील 'वनतारा' वनप्रकल्पात हलवण्यात आलेल्या या हत्तीणीला परत आणावे या मागणीसाठी रविवारी कोल्हापूरकर प्रचंड संख्येने रस्त्यावर उतरले. २८ जुलैला महादेवीला नांदणीतून 'वनतारा' येथे नेण्यात आले, त्यादिवशीही महादेवीला निरोप देण्यासाठी अवघे नांदणी गाव व पंचक्रोशीतील लोक रस्त्यावर जमले होते. हा निरोपच मुळी नाईलाजाने दिला गेला. महादेवी हत्तीण गावातच रहावी यासाठी रस्त्यावर येऊन आंदोलन करण्यापासून सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्यापर्यंत सारे प्रयत्न नांदणी गावाने केले आहेत. १९९२ पासून म्हणजे गेली ३३ वर्षे ही हत्तीण नांदणीतील जैन समाजाच्या मठात वास्तव्याला होती. पण प्रदीर्घ वादानंतर आणि न्यायालयीन संघर्षानंतर या हत्तीणीला अखेर गुजरातच्या 'वनतारा' वनप्रकल्पातील संगोपन केंद्रात हलवण्यात आले. वन्यप्राण्यांसाठीची विशेषाधिकार समिती, उच्च न्यायालय व अखेरीस सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होऊन २८ जुलैला सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निकाल आला होता. मठाकडूनच गेली पाच वर्षे ही न्यायालयीन लढाई लढण्यात आली. मठाच्या मते, १३०० वर्षांपासून असलेल्या या मठात जवळपास ४०० वर्षांपासून हत्ती सांभाळण्याची परंपरा आहे. देशात अनेक मठांमध्ये अशातऱ्हेने हत्ती पाळला जातो. १९९२ पासून महादेवी हत्तीण गावातील सर्व धार्मिक विधी आणि मिरवणुकांमध्ये सहभागी होत आली आहे. मात्र गावाचे आणि महादेवीचे नाते निव्वळ धार्मिक विधींपुरते मर्यादित नाही. गावकऱ्यांचे तिच्याशी अतिशय भावनिक नाते आहे. परंतु वन्यप्राण्यांच्या देखभालीसाठी आणि हक्कांसाठी काम करणाऱ्या 'पेटा' या संस्थेच्या तक्रारीनंतर या प्रकरणाला सुरुवात झाली. गेली ३३ वर्षे मठातील काँक्रिटच्या जमिनीवर साखळदंडांनी एकाकी बांधून ठेवल्यामुळे महादेवी हत्तीणीला संधिवात आदी दुखणी जडली आहेत अशी पेटाची तक्रार होती. परंतु हत्तीणीच्या देखभालीसाठी आपण विशेषाधिकार समितीने सांगितले ते सारे काही केले असे मठाचे म्हणणे आहे. अखेर न्यायालयात निकाल मठाच्या विरोधात गेला व महादेवीची रवानगी 'वनतारा' येथे झाली. तेव्हापासून महादेवीला परत आणण्यासाठी कोल्हापूरकर निरनिराळ्या पद्धतीने आंदोलन करीत आहेत. सह्यांची मोहीम, विविध गोष्टींवर बहिष्कार, मोर्चा अशा आंदोलनांतून यासंदर्भातील तीव्र जनभावना जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्रच नव्हे तर कर्नाटकातील जनतेकडूनही या आंदोलनाला प्रतिसाद मिळाला आहे. दरम्यान, नांदणी मठातून रिलायन्स समुहाच्या गुजरातमधील 'वनतारा' वनप्रकल्पात नेल्यानंतर महादेवी हत्तीणीची प्रकृती सुधारत असल्याचे या प्रकल्पाने एका पत्रकाद्वारे म्हटले आहे. न्यायालयाने आदेश दिला तर हत्तीणीला वैद्यकीय देखरेखीखाली आणि तज्ज्ञांच्या निगराणीत पुन्हा प्रतिष्ठेने कोल्हापूरला पाठवण्याची आपली तयारी असल्याचेही 'वनतारा'ने स्पष्ट केले आहे. दरम्यान, महादेवी हत्तीणीसंदर्भात काय करता येईल यावर चर्चा करण्यासाठी मंगळवारी संबंधितांची तातडीची बैठक बोलावण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सांगितले. यासंदर्भात जनभावना लक्षात घेऊन मार्ग काढण्यासाठी सरकार प्रयत्न करील असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.**

### भाजपतर्फे तळाशेत जिल्हा परिषद हद्दीतील मुंबईकरांना

# गणेशोत्सवानिमित्त मोफत बससेवा!

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष युवानेते निलेश थोरे यांच्या माध्यमातून माणगांव तालुक्यातील तळाशेत जिल्हा परिषद हद्दीतील मुंबईकर चाकरमान्यांसाठी यावर्षीही मोफत बससेवेचे आयोजन करण्यात आले आहे. मागील वर्षी सुरु केलेल्या या उपक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला असल्याने यावर्षीदेखील सेवा देत असल्याचे भाजप तालुकाध्यक्ष परेश सांगले यांनी सांगितले.



सदरची बस सेवा ही नालासोपारा, ठाणे-खोपट, दिवा, कल्याण, डोंबिवली,मुंबई सेंट्रल, दादर, बोरिवली, घाटकोपर, पनवेल, विरार, सायन, मालाड या बस स्थानकापासून माणगांवपर्यंत मिळणार असून यामध्ये भुवन, रातवड, पोटनेर, निळज, वावेदिवाळी, तळाशेत, निवी मूठवली, वारक, साले, खरवली, सुरव तर्फे तळे, बामणोली, पेण तर्फे तळे, काकळ, साई, विहुले, दाखणे या ग्रामपंचायतमधील मुंबईकर चाकरमान्यांकरिता ही सेवा उपलब्ध असणार आहे. युवानेते निलेश थोरे हे नेहमीच राजकारणापेक्षा सामाजिक उपक्रमात पुढाकार घेऊन जनतेला आधार देण्याचे काम करत असतात. या उपक्रमामुळे देखील भागातील मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार असून मुंबईकरांचे गणेशोत्सवादरम्याच्या प्रवासामध्ये गर्दी, वेळेची व आर्थिक बचत त्याचप्रमाणे मानसिक, शारीरिक त्रासापासून सुटका होणार आहे.

# उपविभागीय अधिकाऱ्यांनी केली घरांची पाहणी



**कर्जत : प्रतिनिधी**

सर्वांसाठी घरे - २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात व ग्रामीण भागातील शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकुल करण्यासाठी शनिवारी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात बैठक झाली.

शनिवारी उपविभागीय अधिकारी कार्यालयात कर्जत, खालापूर, खोपोली आणि माथेरान विभागाचे तहसीलदार, मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत शासकीय जागेवरील घरे अधिकृत करण्यासंदर्भात बैठक पार पडली. त्यानुसार कर्जत नगरपरिषद येथील भिसेगाव आदिवासी वाडीत उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ हे स्वतः स्थळी जाऊन पाहणी केली. आणि लवकरच घरे नावावर होणार असल्याचे शब्द दिला आहे.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी, पार्वती वामन वाघ, ग्राम महसूल अधिकारी शीतल मोरे, मंडळ अधिकारी, संतोष जांभळे, मंडळ अधिकारी कडाव तर नगरपरिषदेचे कार्यालीन अधिक्षक रविंद्र लाड, बापू बहीराम उपस्थित होते.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी यांनी शासकीय जागेवरील घरे नियमकुलीत करण्यासाठी शासन दरबारी पत्रव्यवहार केले होते. निवडणूक दरम्यान तत्कालीन मुख्याधिकारी वैभव गारवे त्यानंतर मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी वाडीमध्ये येऊन पाहणी केली. ती वेळेवर बैठकीत विषय घेण्यात येत होता. त्याची अंमलबजावणी झाली असून लवकरच सर्वांना हक्काचे घरे मिळणार आहे.

शासकीय जागेवरील असलेले घरे नियमकुलीत करण्यासाठी शुक्रवारी महसूल सप्ताहाचे आयोजन केले होते. शासन निर्णयान्वये महसुल विभागामार्फत राज्यात महसुल दिनानिमित्त सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात व ग्रामीण भागातील शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकुल करणे बाबत महसुल व वन विभाग यांचेकडील दिनांक २९ जुलै २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये कार्यक्रम आयोजित केले होते. भिसेगावात पाच आरक्षण पडल्याने विशेष दखल उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी घेतली आहे.

# रोह्यात ७ ऑगस्टला जनता दरबार

## लोकांनी सहभागी व्हावे, भाजप पदाधिकाऱ्यांचे आवाहन

**धाटाव : प्रतिनिधी**

नागरिकांच्या समस्या थेट ऐकून घेण्यासाठी व त्या सोडविण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्यावतीने जनता दरबार चे आयोजन येत्या ७ ऑगस्ट रोजी सकाळी १०. ३० वाजता करण्यात आले आहे. हा विशेष कार्यक्रम रोहा शासकीय विश्रामगृहात पार पडणार असून, यामध्ये भाजपाचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार पंडित पाटील हे उपस्थित राहून जनतेशी थेट संवाद साधणार आहेत.

या दरबाराच्या माध्यमातून रोहा तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला आपल्या समस्या, तक्रारी व गरजा थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवताना येणाऱ्या अडचणी, पायाभूत सुविधा, रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण अशा सर्व प्रश्नांवर चर्चा होणार आहे. हा कार्यक्रम म्हणजे तुमचा आवाज थेट लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचवण्याची संधी आहे. त्यामुळे कोणतीही समस्या मनात न ठेवता, माझ्या तालुक्यातील चणेरा, नागोठणे, कोलाड, सुतारवाडी, तिसे, भालगाव, धाटाव, वरसे, वाशी ,तळाघर , विरजोली, उडदवणे, चिल्हे , खांब, आतोणे, संभे, खारगाव, यशवंत खार, मेढा, रोठ बुद्रुक, रोठ खुर्द अशा प्रत्येक विभागातील लोकांनी या दरबारात सहभागी व्हावे, असे आवाहन रोहा तालुका भाजप अध्यक्ष अमित घाग यांनी केले आहे.

कार्यक्रमात संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही आमंत्रित करण्यात येणार असल्याने, काही समस्यांवर तात्काळ तोडगा निघण्याची शक्यता आहे. रोहा तालुक्यातील सर्व नागरिक, महिलावर्ग, तरुण, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, उद्योजक यांना या जनता दरबारात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय जनता पक्षाच्यावतीने करण्यात आले आहे. आपली समस्या मांडण्यासाठी, आपला हक्क मिळवण्यासाठी - ७ ऑगस्ट, सकाळी १०. ३० वाजता, रोहा शासकीय विश्रामगृहात येण्याचे अमित घाग यांनी आवाहन केले आहे.

## आज पनवेल येथे जनता दरबार

**रायगड : रामप्रहर वृत्त**

वैध मापन शास्त्र, यंत्रणेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकता वाढविणे, लोकसंपर्क दृढ करणे आणि ग्राहकांच्या तक्रारीचे वेळेवर निराकरण करणे या उद्देशाने उपनियंत्रक वैध मापन शास्त्र, रायगड जिल्हा क्रमांक १ यांच्या वतीने कार्यालय, निरीक्षक वैध मापन शास्त्र, पनवेल नर्मदा कॉम्फ्लेक्स गाळा क्रमांक ३४,३५, व ३६ स्टेशन रोड पनवेल येथे दि.०५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२. ३० वाजता जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपनियंत्रक वैध मापन शास्त्र रायगड संजीव कवरे यांनी दिली आहे.

जनता दरबारामध्ये ग्राहक संघटना, व्यापारी उपयोगकर्ते संघटना, उत्पादक/पॅकर यांना नियमाबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असून त्यांच्या कांही अडचणी असल्यास निराकरणही करण्यात येईल.

# कशेणे गावात बिबट्या पुन्हा सीसीटीव्हीत कैद; ग्रामस्थ भयभीत

**माणगाव : बातमीदार**

गणेशोत्सव आणि गोपाळकाला सण तोंडावर आले असताना माणगांव तालुक्यातील कशेणे गावात सध्या भीतीचं वातावरण पसरलं आहे. गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या वावराने गावकऱ्यांच्या रात्रींची झोप उडवली असून, ४ ऑगस्ट मध्यरात्रीचे सुमारास पुन्हा एकदा बिबट्या गावातल्या सीसीटीव्हीत स्पष्टपणे कैद झाला आहे.



गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा बिबट्या जवळपास रोजच रात्रीच्या वेळेस भक्षाच्या शोधात गावात फिरताना दिसत आहे. गावातील जनावरांचे अस्तित्व धोक्यात आले आहेच, पण आता सणासुदीच्या काळात गावात बाहेरगावाहून येणाऱ्या लोकांची संख्याही मोठी असते. त्यामुळे लहान मुले, महिला यांचा वावर रात्री अधिक असणार असून, एखादी गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बिबट्याचा वावर सीसीटीव्हीत दिसण्याची पहिलीच वेळ नाही. याआधीही अनेक वेळा त्याचे दृश्य सापडले असून, ग्रामस्थांनी वनविभागाकडे तक्रारी नोंदवल्या होत्या. मात्र विभागाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. या नव्या सीसीटीव्ही फुटेजनंतर तरी वनविभाग जागा होणार का? असा प्रश्न विचारत आहेत

## लोधिवलीत मोफत नेत्रचिकित्सा शिबीर

**रसायनी : प्रतिनिधी**

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल आणि आमदार महेश बादली यांच्या संयुक्त विद्यामाने मोफत डोळे तपासणी शिबिर मगंळवार ५ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित केले आहे. या शिबिरामध्ये मोफत. मोतीबिंदू शस्त्रक्रिया व अल्पदरात चष्मे देण्यात येणार आहेत, तरी ग्रामस्थ सर्व आदिवासी वाडीतील लोकांनी संधीचा फायदा घ्यावा आहे.

# रोह्यात मोतीबिंदू रुग्णांना मिळाली नवी दृष्टी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यात नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात सोमवारी ११० रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी डोळ्यात मोतिबिंदू आढळलेल्या ३४ रुग्णांना नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला, शंकरा आय हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. यासाठी प्रवासाची सोय सुद्धा विनामूल्य करण्यात आली.



रोहा सिटिझन फोरम आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. श्री धावीर मंदीर भक्त निवासात झालेल्या या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. शंकरा आय हॉस्पिटलच्या टीम मॅनेजर रोहिणी बेलोसे, डॉ. पुनम, सायली उतेकर, प्रतिक्षा माने, सिद्धी मोरे, रामदास पवार यांनी रुग्णांची तपासणी केली. तीन वर्षांतील सलग ४० वे शिबिर पार पडले. या आयोजित केलेल्या शिबिरांच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांत ३५०० हून अधिक नेत्र रुग्णांना नवीन दृष्टी प्राप्त झाल्याने शिबिरात तपासणी साठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली आहे.

## मुरूडमध्ये महावितरणच्या कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

वीजपुरवठा अविरत सुरू रहावा यामध्ये कोणताही खंड पडू नये यासाठी महावितरणे वायरमन, तांत्रिक विभाग व अभियंता हे सर्व पावसात सजग राहून वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी नेहमी प्रयत्न करीत असतात. पावसात अविरत मेहनत व सजगता ठेवणाऱ्या महावितरण कर्मचारी वृंदाना खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मुरूड शहर व तालुका महावितरण कामगारांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे हे रेनकोट वाटप करण्यात आले. या वेळी मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष फेरोज घलटे, सरचिटणीस विजय पैर, अजित कासार, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, हसमुख जैन आदि उपस्थित होते.

पान ३ वरून

## पनवेलमध्ये रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा

निवड झालेल्या मंडळींनी अंतिम फेरीसाठी निर्धारित वेळेच्या एक तास अगोदरच उपस्थित राहणे आवश्यक आहे. स्पर्धेसाठी लागणारे साहित्य आणि वाद्ये भजन मंडळांनी स्वतःची आणावी. त्यामध्ये तबला, पेटी, टाळ, पखवाज हे चार आणि कोरस तीन असे एकूण असावेत. प्राप्त परिस्थितीनुसार कार्यक्रमात फेरबदल करण्याचा आयोजकांना अधिकार राहिल तसेच परीक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असणार आहे तसेच स्पर्धेतील गायक, वादक, चकवा, वादक किंवा कोणतेही कोरस दुसऱ्या मंडळात सहभागी होऊ शकणार नाही. त्याचबरोबर भजन सादरीकरण करताना पारंपारिक पोषाख पेहराव असावा, अशी स्पर्धेची नियमावली आहे.

अधिक माहितीसाठी सागर राजे (९२२४३४४१३६), नारायणबुवा (७७१५८३५४२४), अभिषेक पटवर्धन (९०२९५८०३४३), उमेशबुवा चौधरी (९३२४८२४२०५), चंद्रकांत मने (९७६८६५६४८४), विनोद तोडेकर (७०४५८२२५४८), जगदीश म्हात्रे (९३२६८१२१९६), पूनम ठाकूर (७२०८७७६००५), पवन राजे (९२२१०९७३३७), अनिल कोळी (९१६७४७४५०७) किंवा मच्छिंद्र पाटील (९००४०४८६३०) यांच्याशी संपर्क साधावा तसेच रायगडमधील सर्व भजनी मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# पोलादपूरमध्ये किसान गप्पा गोष्टी कार्यक्रमाला प्रतिसाद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर येथील तालुका कृषी कार्यालयामार्फत किसान गप्पागोष्टी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असता तालुक्यातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी व्यासपीठावर रोहा येथील कीड व रोग तज्ञ जीवन आरेकर, महाडचे उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खटकळे, पोलादपूर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे, श्रीवर्धन तालुका कृषी अधिकारी सुनील जाधव, मंडळ कृषी अधिकारी भरत कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

आंबा पीक लवकर येण्यासाठी व्यवस्थापन आणि भौगोलिक परिस्थितीची अनुकुलता आवश्यक आहे. फांद्या व झाडांना मर का येते तर बुरशीनाशक फवारणी मर किंवा फांद्या सुकण्यापुर्वी करावी. नीळे भुंगेरे कीड प्रादुर्भाव तसेच बगळ्या रोग यावर उपाय म्हणून वेळीच औषधफवारणी करता येते. कीड ओळखा आणि शेतातील बांधावरील गवत काढणी तसेच नत्र खताचा संतुलित वापर आवश्यक आहे. आंतरप्रवाही औषथ वापर आवश्यक आहे, अशी माहिती रोहा किल्ला येथील कृषी विज्ञान केंद्राचे कीड व रोग मार्गदर्शक जीवन आरेकर यांनी दिली.



# नेरळमधील वयोवृद्ध व्यक्तीची आत्महत्या

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील पाडा भागात असलेल्या राजबाग गृहनिर्माण सोसायटीत राहणाऱ्या एका वृद्ध व्यक्तीने जीवनाला कंटाळून राजमाता जिजामाता तलावात उडी मारून आत्महत्या केली. नैराश्यातून आपले जीवन संपवत असल्याची चिठ्ठी स्वतःच्या खिशात ठेवून आत्महत्या केली असून त्या वृद्धाचे वय ७५ वर्षे इतके होते.

पाडा विभागातील राजबाग गृहनिर्माण सोसायटीत राहणारे जनार्दन नारायण गायकवाड हे येथील १२ नंबर बिल्डिंग मध्ये राहत होते. दुपारी काही रहिवाशी यांना पाण्यात वर तरंगलेला मृतदेह आढळून आला. त्यांनतर नेरळ पोलिस यांना कळविण्यात आल्यावर पोलिसांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला. त्या मृतदेहाचे खिशात असलेल्या आधार कार्ड आणि चिठ्ठीवरून स्पष्ट झाले.

पोलिसांनी सदर मृतदेह शव विच्छेदन करण्यासाठी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पाठविला आणि शव विच्छेदन करून झाल्यावर त्यांची शव नातेवाईक यांच्या ताब्यात दिले.आत्महत्या करणाऱ्या संबंधित व्यक्तीच्या खिशामध्ये पोलिसांना आपण आयुष्याला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे लिहिले होते आणि त्यांचा मृतदेह सापडल्यावर पत्ता शोधण्यास अडचणी येऊ नयेत. यासाठी पत्ता देखील लिहून ठेवला होता.या मृतदेहाची नोंद नेरळ पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# निजामपूरमध्ये कारच्या धडकेत एकाचा मृत्यू; तरुणी जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर बसस्थानकासमोर कारची ठोकर लागून एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर या अपघातात १७ वर्षाची तरुणी जखमी झाली आहे.



दिनांक ४ ऑगस्ट रोजी सकाळी ७.४० वा. च्या सुमारास मारुती सुझुकी बेलेनो गाडी वरील चालक क्रिशांत विजय उबाळे (वय १९, रा. पिंपळोली बौद्धवस्ती तालुका मुळशी, जि. पुणे) याने त्यांच्या ताब्यातील बलेनो गाडी माणगाव बाजूकडे घेऊन जात असताना निजामपूर येथील रिक्षा स्टँड जवळ सलीम मोहम्मद चाफेकर (वय ४०, रा. निजामपूर ता. माणगाव) यांना ठोकर मारली. या अपघातात सलीम चाफेकर यांना दुखापत झाल्याने उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे आणले असताना उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तर प्रगती बबन सुतार (वय १७, रा. बामणगाव निजामपूर ता. माणगाव) ही ठोकर लागल्याने जखमी झाली.

या अपघाताची माहिती माणगाव पोलीस ठाण्यात समजतात पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी तात्काळ आपल्या पोलीस कर्मचाऱ्यासह घटनास्थळी धाव घेतली दरम्यानच्या काळात निजामपूर पुणे बाजू व निजामपुर माणगाव या बाजूकडे वाहतूक कोंडी झाली होती. ती वाहतूक कोंडी पोलिसांनी सोडवली.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाणे येथे करण्यात आली असून पुढील तपास माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली म.पो.स.इ.जाधव करीत आहेत.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

## समाजसेवेचा मार्ग यशापर्यंत घेऊन जातो -लोकनेते रामशेठ ठाकूर | स्वच्छतादूतांना रेनकोट, टिफीन बॉक्स वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पैसा महत्त्वाचा नसून सामाजिक उपक्रम राबवण्यामध्ये योगदान महत्वाचे आहे. त्यामुळे मी जे सामाजिक उपक्रम राबवतो त्यामध्ये मला जास्त आनंद मिळतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांच्या तत्वांचे पालन हे आमदार प्रशांत ठाकूर करतात आणि त्यांचे मार्गदर्शन घेत भाजपचे तरुण कार्यकर्ते समाजसेवा करत आहेत. हा मार्ग आपल्याल यशापर्यंत घेऊन जाणार आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वच्छता दूतांना रेनकोट आणि टिफीन बॉक्स वाटपाच्या कार्यक्रमावेळी केले.

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामजिक उपक्रम राबण्यात येत आहेत. त्यापार्श्वभुमीवर भारतीय जनता युवा मोर्चा प्रभाग क्रमांक १४ यांच्या वतीने आपला परिसर स्वच्छ ठेवण्यामध्ये महत्त्वाची भुमीका बजवणाऱ्या स्वच्छता दूतांसाठी रेनकोट व टिफीन वाटपाचा कार्यक्रम सोमवारी पनवेल शहरातील बावन बंगला येथे आयोजीत करण्यात आला होता.





या कार्यक्रमाचा शुभारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाला असून त्यांनी स्वच्छतादूतांना रेनकोट आणि टिफीन बॉक्सचे वाटप केले.

या कार्यक्रमाला लोकनेते दि.बा.पाटी यांचे सुपूत्र अतुल पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, मुकीत काझी, माजी नगरसेविका सारिका भगत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमीत झुंझारराव, शहर सरचिटणसि अमित ओझे, रुपेश नागवेकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रशांत शेट्टे, गणेश म्हात्रे, शुभम कांबळे, उज्वला पाटील, प्रभाग १४ चे युनीयन अध्यक्ष शरद कांबळे, ओमकार सुर्वे, ओमकार डाकी, वास्तव चव्हाण, स्वयम चव्हाण, नील ठक्कर, मैत्रेय जोशी, विकास टाकयांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

### आज खारघरमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त ५ ऑगस्ट रोजी खारघर येथील शिवतेज मित्र मंडळ व साबाई माता महिला मंडळ यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

खारघर सेक्टर १२ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील दुर्गामाता मंदिर येथे होणाऱ्या या शिबिरात मधुमेह, रक्तदाब, नाडी परीक्षण, योगा मार्गदर्शन, महिलांच्या आरोग्य समस्या तसेच वैद्यकीय तज्ज्ञांकडून वैद्यकीय सल्ला या शिबिरात दिला जाणार आहे. या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सेक्टर १२ महिला मोर्चाच्या अध्यक्षा सीमा खडकर यांनी केले आहे.

## लोकनेते दि.बा. पाटील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्यावतीने शालेय वस्तू वाटप कार्यक्रम सोमवारी आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून पनवेल महापालिकेच्या लोकनेते दि.बा.पाटील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमीत्त कोणतेही पुष्पगुच्छ तसेच जाहीरात न देता सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार पनवेल महापालिकेच्या लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.




या कार्यक्रमास भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, भाजप नेते श्रीनंद पटवर्धन, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, सरचिटणीस अमित ओझे, केदार भगत, रूपेश नागवेकर, रोहित जगताप, प्रशांत शेट्टे, देवांशू प्रभाळे, अक्षय सिंग, आकाश गाडे, जयेश चव्हाण, जयेश घरत, अखिलेश पाटील, निखील घरत, अर्जून भगत, अनिमेश ओझे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## धाकटा खांदा येथे चित्रकला स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे यांच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त नुकतीच चित्रकला स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. या चित्रकला स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सोमवारी धाकटा खांदा येथील महापालिकेच्या श्री गणेश विद्या मंदिर प्राथमिक शाळेत करण्यात आले होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजेत्या विद्यार्थ्यांन बक्षीसाचे वितरण करून त्यांचा गुणगौरव केला. या कार्यक्रमाला माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश पाटील, गणपत म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, कोंडीराम म्हात्रे, सुकाणी भगत, विलास पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर सूचना**

**विषय :-** सार्वजनिक गणेशोत्सव मंडप परवानगी व तद्अनुषंगीक पुर्वनियोजनकामी बैठकीबाबत.

**संदर्भ :-** जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये मे. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश.

गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व त्या दृष्टीने उपाययोजना करणेकामी गणेशोत्सव मंडळांना Online पध्दतीने एक खिडकी योजना अमंलात आणुन http://pendal.maharts.com/Login ही वेबसाईट तयार करणेत आली आहे.

जनहित याचिका क्र. १७३/२०१० (डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर संदर्भात मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशासन अनुसरुन पनवेल महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवानिमित्त उभारण्यात येणारे मंडप/स्टेज/कमानी इत्यादींबाबत सविस्तर कार्यपध्दती (S.O.P.) तयार केली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार मार्गदर्शक सुचना देणेकामी, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येत्या आगामी कालावधीत साजरा होणाऱ्या **''सार्वजनिक गणेशोत्सव २०२५''** करीता उत्सव साजरा करणारे संबंधित मंडळ/ संस्था/ व्यक्ती इत्यादी समवेत पनवेल महानगरपालिका हद्दीतील शासकीय अधिकारी / कर्मचारी (उपविभागीय अधिकारी, पनवेल, तहसिलदार पनवेल, पोलिस उपायुक्त, नवी मुंबई व महानगरपालिका हद्दीतील सर्व वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मा. उपआयुक्त वाहतुक विभाग, नवी मुंबई, मा. पोलीस निरिक्षक वाहतुक विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अधिक्षक/अभियंता व इतर) संबंधित अग्निशमन अधिकारी आणि सर्व संबंधित प्रभागक्षेत्र अधिकारी यांची संयुक्त बैठक **दिनांक ०५/०८/२०२५ रोजी वेळ सकाळी ११.३० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल** या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. तरी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात **''सार्वजनिक गणेशोत्सव २०२५''** करीता उत्सव साजरा करणारे सर्व संबंधित मंडळ/संस्था/ व्यक्ती यांनी **दिनांक ०५/०८/२०२५ रोजी वेळ सकाळी ११.३० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल** या ठिकाणी आयोजित बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे.

दिनांक : ४/०८/२०२५

**सही/-**
**(रविकिरण घोडके)**
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.३८१/३८८/२०२५
दिनांक : ४/०८/२०२५



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच अनुषंगाने तक्का येथील भाजप युवा नेते प्रतिक देवचंद बहिरा जनसंपर्क कार्यालय येथे रेशन कार्ड लिंक शिबिराचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

### अलिबाग नगर परिषद

ता. अलिबाग जि. रायगड - ४०२२०१

**जाहीर निविदा सन २०२५-२६**

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे वीज विभागाकडुन कामांकरिता नोंदणीकृत पुरवठादारांकडुन/परवानाधारकांकडुन द्वी लिफाफा पध्दतीने जाहीर निविदा दर मागविणेत येत आहेत.

**टिप :-** वरील निविदे मध्ये (०६) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहीती संबंधीत अधिकृत माहिती व निविदा फॉर्मसाठी नगरपरिषद कार्यालयातील वीज विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संपर्क साधावा.

दिनांक : ०५/०८/२०२५
जा.क्र. २०८७

**स्वा/-**
**मुख्याधिकारी**
अलिबाग नगरपरिषद जि. रायगड

### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर सूचना**

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली गाव येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता जागा भाडेतत्वावर घेणेबाबत.**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली गाव येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका तळमजला अथवा तळमजला + पहिला मजला वरील १००० ते १२०० चौ. फुट जागा भाडेतत्वावर घेणेकामी इच्छुक व्यक्ती/संस्था यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत. सदरील जागा/इमारत ही बांधकाम पूर्ण असलेली, वाहनतळ व शौचालय या सुविधांयुक्त असाव्यात. जागा/इमारत भाडेतत्वावर घेणेचा कालावधी २ वर्षांचा असेल.

इच्छुक व्यक्ती / संस्था यांनी जागेचे ठिकाण, भाडे इ. तपशीलासह अर्ज पनवेल महानगरपालिकेच्या pmcmalmatta2018gmail.com या मेलआयडीवर अथवा प्रत्यक्ष कार्यालयात दि. ११/०८/२०२५ रोजी दुपारी १२.०० पर्यंत जमा करावेत.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.३७९/३८६/२०२५
दिनांक : ४/०८/२०२५

**सही/-**
**उप आयुक्त, मालमत्ता**
पनवेल महानगरपालिका

### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव **खांदेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्या,खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड.,** असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०६/०८/२०२५ ते १२/०८/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १३/०८/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि. १५/०८/२०२५ ते ०१/०९/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे - दिनांक १४/०९/२०२५ रोजी घेण्यांत येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल, तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : ४/०८/२०२५

**सही/-**
**(अश्विनी शिंदे)**
निवडणूक निर्णय अधिकारी

### कुळगांव बदलापूर नगर परिषद

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल : coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट : http://kbmc.gov.in

संदर्भ : कुबनप/भांडार विभाग/३८/२०२५-२६ दिनांक :- ४/८/२०२५

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ०५/२०२५-२०२६**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाकरिता अवजारे (हार्डवेअर) साहित्य खरेदी करुन पुरवठा करणेबाबतच्या अनुभवी निविदाधारकाकडुन दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेत येत आहे. निविदा संच विक्री व स्विकृती दिनांक ५/८/२०२५ पासुन सकाळी १०.३० पासुन ते दिनांक ११/८/२०२५ रोजीपर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत राहील. तसेच निविदा उघडणे (शक्य झाल्यास) दिनांक १२/८/२०२५ रोजी सायंकाळी १६.०० अथवा अन्य सोईच्या दिवशी.

तसेच याबाबत संपूर्ण माहिती https:/mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन प्राप्त करावयाचे असुन त्याच संकेत स्थळावर ई-निविदा फॉर्म फी, इसारा (बयाणा) रक्कम व ई- निविदा Online सादर करणे बंधनकारक आहे. प्राप्त निविदापैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव यांनी राखुन ठेवला आहे. निविदा नियम व अटी-शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगाव यांनी राखुन ठेवला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक,**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद,
कुळगांव,

### जाहीर नोटीस

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात** (रायगड, रत्नागिरी जिल्हा)

मुकादमा क्रमांक/ सी.सी./आर.जी.डी/९८/२०२५

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल
पत्ता : ६२६ अे / ७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ, टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूध्द**

१) श्री. दिलीप अविनाश नाईक
पत्ता : पंचशिल नगर, माथेरान, पो. माथेरान, ता.कर्जत, जि.रायगड - ४१०१०२
२) श्री. संजीव रघुनाथ कोळी
पत्ता : पंचशिल नगर, साईबाबा रोड, माथेरान, पो. माथेरान, ता.कर्जत, जि.रायगड-४१०१०२
३) श्री. गणेश अनंता शिंदे
पत्ता : नेरळ खांडा, पो. नेरळ ता. कर्जत, जि.रायगड - ४१०२०१ } **प्रतिवादी**

**दावा रूपये ५४,७६९/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १७/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास अस कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०१/०८/२०२५ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या. अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टॅड समोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा

### जाहीर नोटीस

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात** (रायगड, रत्नागिरी जिल्हा)

मुकादमा क्रमांक/ सी.सी./आर.जी.डी/७९/२०२५

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल
पत्ता : ६२६ अे / ७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ, टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूध्द**

१) श्रीमती लता लाला सुतार
पत्ता : सद्गुरु अपार्टमेंट, मु.पो.मुद्रे खुर्द, नाना मास्तर नगर रोड, ता.कर्जत, जि.रायगड - ४१०२०१
२) श्रीमती सुप्रिया सुनिल मोरे
पत्ता : स्वप्नसिद्धी अपार्टमेंट, मु.पो. मुद्रे खुर्द, नाना मास्तर नगर रोड, ता.कर्जत, जि.रायगड - ४१०२०१
३) श्रीमती कल्पना इरेश्वर गायकवाड
पत्ता : घर क्र.६५, मु.पो.मुद्रे बुद्रुक, कचेरी रोड, भैरवनाथ नगर, ता. कर्जत, जि.रायगड-४१०२०१ } **प्रतिवादी**

**दावा रूपये ५०,१४३/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १७/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास अस कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०१/०८/२०२५ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या. अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टॅड समोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा

### जाहीर नोटीस

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात** (रायगड, रत्नागिरी जिल्हा)

मुकादमा क्रमांक/ सी.सी./आर.जी.डी/७८/२०२५

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल
पत्ता : ६२६ अे / ७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ, टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूध्द**

१) श्रीमती आशा राहुल भासे
पत्ता : वदप, पो. गौरकामत, ता. कर्जत, जि-रायगड-४१०२०१
२) श्रीमती लिलाबाई वासुदेव घाडगे
पत्ता : घर नं. ५४, धाकटे वेणगाव, पो. वेणगाव, ता. कर्जत, जि-रायगड - ४१०२०१
३) श्रीमती कुसूम दत्तात्रय सावंत
पत्ता : धाकटे वेणगाव, पो. वेणगाव, ता. कर्जत, जि-रायगड -४१०२०१ } **प्रतिवादी**

**दावा रूपये ६०,०११/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १७/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास अस कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०१/०८/२०२५ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन (रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या. अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टॅड समोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा




# एक उत्तम नेतृत्व

राजकारण हे केवळ सत्तेचे माध्यम नसते, तर तो सेवा, संकल्प आणि सामाजिक परिवर्तनाचा एक सशक्त मंच असतो. या भूमिकेला सार्थ ठरणाऱ्या आणि निस्वार्थीपणे जनतेच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या नेत्यांमध्ये आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर यांचे नाव आदराने घ्यावे लागेल. वाढदिवसाच्या औचित्याने त्यांच्या कार्याचा मागोवा घेणे ही एक सन्मानाची गोष्ट आहे.

पनवेल मतदारसंघाचे चार वेळा आमदार असलेले प्रशांत ठाकूर हे केवळ राजकारणी नाहीत, तर दूरदृष्टी असलेले विकासनिष्ठ नेतृत्व आहे. राजकीय वारसा लाभलेले असूनही त्यांनी स्वबळावर आपली ओळख निर्माण केली. त्यांच्या वडिलांनी माजी खासदार रामशेठ ठाकूरसाहेबांनी समाजकारणात ठसा उमटवला आणि मुलाने तोच वारसा आधुनिक युगाशी जुळवून पुढे नेला. युवकांची ऊर्जा, लोकांच्या समस्या आणि क्षेत्राची गरज यांची समज व त्यावर तातडीची कृती हाच त्यांच्या नेतृत्वाचा गाभा आहे.

आमदार असलेले प्रशांत ठाकूर २००९पासून सातत्याने पनवेल विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यांनी भाजपच्या झेंड्याखाली पनवेलच्या विकासाची नवी दिशा ठरवली. २००९नंतर पुढे २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग चार निवडणुकांमध्ये त्यांनी प्रचंड मताधिक्याने विजय संपादन करत मतदारांचा ठोस पाठिंबा मिळवला. त्यांनी आपल्या कार्यातून राजकारणातल्या निष्ठा, शिस्त आणि दूरदृष्टीचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांचे काम फार जवळून पाहिले आहे. कोकण पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असताना मला साहेबांचे कायमच सहकार्य लाभले आहे. कोकण विभागातील विविध प्रश्नांची त्यांना उत्तम जाण आहे. यामुळे त्यांचे विविध विषयांवर वेळोवेळी मला मार्गदर्शनदेखील लाभले आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलच्या भौगोलिक, नागरी, औद्योगिक गरजा नेमक्या ओळखल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे 'स्वराज्य' ही अत्याधुनिक महानगरपालिका इमारत आकाराला येत आहे. पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्था, रस्त्यांचे जाळे, रेल्वेस्थानकाचे आधुनिकीकरण




या साऱ्या क्षेत्रांत त्यांनी आधुनिकतेची व्याख्या मांडली. त्यांच्या प्रयत्नांमुळे पनवेल हे केवळ एक शहर राहिलं नाही, तर मुंबईच्या विस्ताराचा मजबूत भाग बनू लागले. त्यांनी रेल्वे मंत्रालयाकडे सबवे विस्तार, हार्बर लाईन इंटरकनेक्टिव्हिटी, आणि स्थानक सुधारणा यासाठी पाठपुरावा केला. देहरंग धरणाची उंची वाढवण्यासाठी निधीची मागणी करून त्यांनी पनवेलचा पुढील काही दशकांचा पाण्याचा प्रश्न आजच सोडवण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला.

शहराच्या पलीकडेही आमदार प्रशांत ठाकूर यांची नजर पोहचलेली आहे. ग्रामीण भागांमध्ये एमएमआरडीए अंतर्गत मूलभूत सुविधा पोहचवण्यासाठी त्यांनी आवाज उठवला. या गावांमध्ये रस्ते, वीज, पाणी, आरोग्य सेवा आणि शिक्षण या पायाभूत गरजांची पूर्तता करण्यावर त्यांनी भर दिला.

आमदार प्रशांत ठाकूर यांचे सामाजिक योगदानही तितकेच व्यापक आहे. 'हॅप्पी स्कूल' उपक्रम, शैक्षणिक साहित्य वाटप, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिरे, महिला बचत गटांना प्रोत्साहन आणि आदिवासी समाजासाठी राबवलेली मदतकार्य ही त्यांच्या सामाजिक जाणिवेची उदाहरणे आहेत. त्यांनी अनेक तरुणांना स्टार्टअपसाठी प्रेरित केले, तर महिलांना अर्थसहाय्य आणि प्रशिक्षण दिले. शैक्षणिक



क्षेत्रातही त्यांची भूमिका सशक्त आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि शाहू आयटी इन्स्टिट्यूट या संस्थांद्वारे त्यांनी शैक्षणिक पायाभूत सुविधांचा विस्तार केला. डिजिटल शिक्षण, संगणक प्रयोगशाळा, स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन यामुळे हजारो विद्यार्थ्यांना दिशा मिळाली.

सिडकोच्या अध्यक्षपदावर असताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनदरबारी मोठे निर्णय घेतले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना प्रकल्प, घरे, रस्ते, जलवाहतूक या सर्व प्रकल्पांना गती देत स्थानिकांच्या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केले. सिडकोचे अनेक धोरणात्मक निर्णय त्यांच्या नेतृत्वातच मूर्त स्वरूपात उतरले.

आमदार प्रशांत ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे संयम, विचारशीलता आणि कर्तृत्व यांचा त्रिसूत्री संयोग. लोकांशी थेट संवाद, भूमिपुत्रांसारखा आपलेपणा, विकासाची दूरदृष्टी आणि निर्णयक्षमतेची ताकद यामुळे पनवेलच्या जनतेच्या मनात त्यांनी आपले अढळ स्थान निर्माण केले. त्यामुळे साहेबांचा वाढदिवस हा केवळ व्यक्तिगत नाही, तर पनवेलच्या प्रगतीच्या मार्गावर चालणाऱ्या त्या प्रवासाचा उत्सव आहे.

आज आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल झपाट्याने बदलत आहे शहरी आधुनिकतेपासून ते ग्रामीण समावेशकतेपर्यंत. त्यांचे नाव म्हणजे विश्वास. त्यांच्या निर्णयांमध्ये स्पष्टता आणि त्यांच्या कामांमध्ये कृतीशीलता यामुळे एक सक्षम लोकप्रतिनिधी कसा असावा याचे ते जिवंत उदाहरण आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**–आमदार निरंजन डावखरे,**
**कोकण विभाग पदवीधर मतदारसंघ**



# जनमानसातील आमदार

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार असा नावलौकिक असणारे आमदार प्रशांतदादा ठाकूर नावाप्रमाणेच हुशार, शांत स्वभावाचे, संयमी आणि गोरगरीबांच्या मदतीला तत्पर असणारे नेतृत्व आहे.

आमदार प्रशांतदादा ठाकूर यांचा जन्म ५ ऑगस्ट १९७४ रोजी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या घरात झाला. आईचे नाव शकुंतला ठाकूर. प्रशांतदादांना इंजिनिअरिंगचा अभ्यास सुरू असताना शिक्षण सोडून समाजकारणात यावे लागले. वडिलांनी इच्छा आणि जनमानसाचे प्रेम यामुळे २००६मध्ये ते पनवेल नगर परिषदेमध्ये निवडून आले आणि नगराध्यक्ष झाले. पुढे २००९, २०१४, २०१९ आणि मागील २०२५ अशा सलग चार वेळा ते विधानसभा निवडणुकीत आमदार म्हणून निवडून आले.

पनवेलचे नगराध्यक्ष ते आमदार हा प्रवास करत असताना त्यांनी जनमानसात राहून प्रचंड कामे केली. त्यांनी केलेले कार्य पाहून रायगड जिल्ह्यातील युवकांचे ते प्रेरणास्थान बनले. त्यांच्या या कारकीर्दीत त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. युवक पुरस्कार, युवा गौरव पुरस्कार, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके पुरस्कार आदींचा त्यात समावेश आहे.

आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी भारतीय जनता पक्ष रायगड जिल्हाध्यक्ष, मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थचे संचालक, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशन उपाध्यक्ष अशी पदे भूषविली.

अतिशय शांत, संयमी, हुशार नेतृत्व असणारे प्रशांतदादा ठाकूर यांचे वाढदिवसाचे अभीष्टचिंतन. त्यांना लवकरच मंत्रीपद मिळो हीच अपेक्षा आणि पुन्हा एकदा उदंड आयुष्याच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!

**–आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे,**
**कोकण विभाग शिक्षक मतदारसंघ**

# कार्यकर्त्यांना बळ देणारे नेतृत्व

आमदार प्रशांतदादा ठाकूर आणि माझी ओळख मी कळंबोलीचा भाजपचा शहराध्यक्ष असताना झाली. एकदा शाळेमध्ये आधार कार्डचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी आमदार प्रशांतदादा ठाकूर हे काँग्रेसमध्ये होते. काँग्रेसचे कळंबोलीतील तेव्हाचे नेते सुदाम पाटील यांनी स्टेजवर माझी ओळख करून दिली आणि तेव्हाच प्रशांतदादा म्हणाले, तुम्ही जरी वेगळ्या पक्षात असला तरी हा शासकीय कार्यक्रम आहे. तुम्ही पुढे या.

यानंतर अनेक वेळा आमची कार्यक्रमानिमित्त भेट झाली. पुढे काही कारणास्तव मला भाजप सोडून २०१३मध्ये शे.का.पक्षात जावे लागले, तर २०१४मध्ये आमदार प्रशांतदादा ठाकूर यांचा भाजपमध्ये प्रवेश झाला. भाजपमध्ये आल्यानंतर आमदारांनी कार्यकर्त्यामार्फत निरोप पाठवला, बबनराव तुम्ही भाजपचे कट्टर कार्यकर्ते आहात. आता आम्ही भाजपमध्ये आलो आहोत आणि तुम्हाला आमच्याबरोबर काम करायचे आहे. तेव्हा आमदारकीच्या निवडणुकीची रणधुमाळी चालू होती. मी त्यांना सांगितले, दादा हे इलेक्शन झाल्यानंतर मी तुमच्यासोबत येईन आणि निवडणूक झाल्यानंतर मी



माझा शब्द खरा करून दाखवला.

माझा मूळ पिंडच भाजपचा असल्याने मी दुसऱ्या पक्षात काम करू शकत नव्हतो. भाजपमध्ये परत आल्यानंतर मला आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी पनवेल तालुका ओबीसी सेलचे तालुका उपाध्यक्ष केले. त्यानंतर २०१७ साली महापालिकेच्या निवडणुका लागल्या आणि या निवडणुकीमध्ये प्रभाग आठमधून माझ्या पत्नीला त्यांनी व लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांनी विश्वासाने उमेदवारी दिली. आम्ही निवडणूक लढवली व थोड्या मताने पराभव झाला, परंतु कार्यकर्त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणारे आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी लगेच फोन करून मला सांगितले, तुम्ही थोड्या मताने हरला आहात. ही तुमची हार नाही, हा तुमचा विजय आहे. तुम्ही यापुढे जोमाने काम करा व परत कामाला लागा. मी झालेला पराभव विसरून पक्षाचे काम जोमाने सुरू केले व लगेच दोन-तीन महिन्यांत पक्षाच्या जिल्हा रचनेमध्ये आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी मला भाजप भटके विमुक्त आघाडीचे रायगड जिल्हा अध्यक्षपद दिले. पुन्हा तीन वर्षांनंतर जेव्हा पक्षाची रचना बदलली म्हणजे रायगडचे दोन भाग झाले त्यानंतरसुद्धा पुढील दोन वेळेस मला उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी नियुक्त केले आहे. मीसुद्धा आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करून दाखवला व माझ्यावर सोपवलेली जबाबदारी इमानेइतबारे पार पाडली. त्यामुळे त्यांची आणि आमची मैत्री तर घट्ट झाली, शिवाय राजकारणापलीकडे एक नातं निर्माण झालं. ते नातं विश्वासाचं होतं व आहे.

जेव्हा जेव्हा मी आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्याकडे काम घेऊन गेलो तेव्हा तेव्हा त्यांनी ते काम करून दिले. जी कामे घेऊन गेलो ती कामं जनतेची व सर्वसामान्य लोकांची होती. त्यामुळे कधीही मला अडचण आली नाही. कार्यकर्त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणाऱ्या आमच्या या नेत्याचा वाढदिवस म्हणजे गोरगरिबांसाठी एक पर्वणी असते, कारण यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण जिल्हाभर आम्ही सर्व कार्यकर्ते समाजोपयोगी कार्यक्रम राबवत असतो आणि याचा फायदा गोरगरीब जनतेला होत असतो.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शिकवण व आमदार प्रशांतदादा ठाकूर यांचे बळ नेहमीच कार्यकर्त्यांना मिळत असते. म्हणून अशा नेत्यांवर प्रेम करणारी जनतासुद्धा खूप मोठी आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आमदार प्रशांतदादा ठाकूर यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! भगवानबाबा व वामनभाऊ महाराज आमच्या या लाडक्या नेत्याला उदंड आयुष्य देवो हीच त्यांच्या चरणी प्रार्थना!!

**–बबन बारगजे,**
**जिल्हाध्यक्ष, भाजप उत्तर रायगड**
**भटके विमुक्त आघाडी**












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

## निवडक

### मंदिरात चोरी करणारा ताब्यात

**पनवेल :** तालुक्यातील नेरे गावातील गावदेवी मंदिरात चोरी करणाऱ्या चोरट्यास पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून मंदिरातील दोन समई हस्तगत केल्या आहेत. नेरे गावातील गावदेवी मंदिरात चोरी झाल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि गजाजन घाडगे यांच्या मार्गदर्शनखाली सपोनि अनिरुद्ध गिजे, उपनिरीक्षक हर्षल राजपूत, पोहवा धुमाळ, तांडेल, कुदळे, बाबर, देवरे, म्हारसे, शिपाई भगत, खताळ आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाआधारे आरोपी अनेश रमेश कुमार (वय ४३) याला ताब्यात घेऊन त्याच्या कडून मंदिरातील दोन चोरीच्या समई हस्तगत केल्या आहेत.

### हुक्का पार्लरवर कारवाई

**पनवेल :** येथील रिसॉर्टमध्ये चालणाऱ्या हुक्का पार्लरवर गुन्हे शाखा पोलिसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी चौघांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेलच्या माणघर येथील एका रिसॉर्टमध्ये अवैधरित्या हुक्का पार्लर चालवले जात होते. याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकाला मिळाली होती. त्यावरून वरिष्ठ निरीक्षक संदीप निगडे यांच्या पथकाने रात्री त्याठिकाणी छापा टाकला. या वेळी १५ ग्राहक हुक्का पिताना आढळले. त्यानुसार कारवाईत हुक्क्याचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. तर अवैधरित्या हुक्का पार्लर चालवल्याप्रकरणी चौघांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लाखोंच्या मोबाईल चोरीप्रकरणी तिघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील ओरियन मॉल येथे असलेल्या आयप्लॅनेट स्टोअर नावाच्या मोबाईल दुकानात जवळपास १२ लाख ५० हजार रुपये किमतीच्या मोबाईल चोरीप्रकरणी तीन जणांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या गुन्ह्यातील मुख्य आरोपी अशोक ज्योतिष घराई (रा.ओरिसा) याने दुकानातील त्याच्याकडे नऊ आयफोनची विक्री करून त्याच्याकडे जमा असलेली रोख रक्कम ही कंपनीकडे जमा न करता तसेच बनावट पेबॉय लिंकवर खोटे बिल तयार करून काही आयफोन मोबाईल व काही रोख रकमेचा अपहार करून कंपनीची फसवणूक करून तो ओडिसा येथे पसार झाला होता.



याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, हवालदार सूर्यकांत कुडावकर, प्रवीण मेथी, रवींद्र पारधी, पोलीस शिपाई शशिकांत काकडे, साईनाथ मोकळ आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे व गुप्त बातमीदारच्या मदतीने या गुन्ह्यातील मुख्य आरोपी अशोक ज्योतिष घराई हा ओरिसा येथील एका गावात लपल्याची माहिती मिळाली.

यानुसार स्थानिक पोलिसांच्या मदतीने तेथील नदी पार करून त्याला ताब्यात घेतले असता त्याने दिलेल्या माहिती नुसार त्याला चोरीस मदत करणारा रजत सिंग व चोरीचे मोबाईल विकत घेणारा विशाल दोषी (रा. ताडदेव, मुंबई) यांना दाखल गुन्ह्याचे कामी अटक करून पोलीस कस्टडी घेण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.



**कामोठे : येथील सेक्टर ७ मधील जुई गार्डन या सोसायटीत सुशोभीकरणाची सुरुवात शोभिवंत झाडांची लागवड करून करण्यात आली. या वेळी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, रवींद्र म्हात्रे, सोसायटीचे अध्यक्ष नीलकंठ गावडे, सेक्रेटरी भोसले, खजिनदार डॉ. शंकर जाधव, माने, अनिलकुमार, यादव, विचारे, खरात, बरमाडे, पांडे, खोत, गोडसे, बोचरे, कदम, शेट्टी, वराडकर, ननावरे, देसाई, रामू शेट, मुरगन शेट आणि सर्व व्यापारी मित्र, जुही गार्डन महिला मंडळ तसेच मोठ्या संख्येने सोसायटीमधील रहिवासी उपस्थित होते.**



**खारघर : पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या खारघर येथील प्रवासी बसथांब्याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रवासी बस थांब्यामुळे नागरिकांना ऊन, वारा, पाऊस यापासून दिलासा मिळणार आहे. उद्घाटनावेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह खारघर, तळोजा येथील भाजप पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## वाहतूक समस्यांसंदर्भात उद्या खांदा कॉलनीत बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले यांनी खांदा कॉलनी छत्रपती शिवाजी चौकमध्ये उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या.

या वेळी समस्यांचे निराकरण करण्यासाठी हवी ती मदत करण्याच आश्वासन भोसले यांनी दिले. ज्या ज्या सूचना नागरिकांनी सांगितल्या त्याचे तंतोतंत पालन करण्याचे आश्वासन दिले. येत्या बुधवारी (दि.६) सकाळी ११ वाजता खानदेश बॅंक्वेट हॉल सेक्टर १० छत्रपती शवाजी चौकच्या बाजूला या ठिकाणी सर्व शाळा व हॉलची मालक शाळेचे प्रिन्सिपल यांना आमंत्रित करण्यात येणार आहेत तरी खांदा कॉलनीतील सर्व आजी माजी नगरसेवक सर्व पक्षाचे पदाधिकारी समाजसेवक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप नवीन पनवेल शहर मंडळ सरचिटणीस भीमराव पोवार यांनी माहिती देताना केले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रोहिदासवाड्यात आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त संत रोहिदास वाड्यात रविवारी (दि.३) विविध मोफत शिबिर, आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर आणि नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याचा ४०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.





या शिबिराला प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, प्रितम म्हात्रे, रत्नप्रभा घरत, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, दर्शना भोईर, नगरसेविका सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, सारिका भगत, पनवेल शहर उपाध्यक्ष सुमित झुंजारराव आदींसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्ताने विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी प्रभाग १९, पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, माजी नगरसेविका रेणुका मोहोकर यांच्या पुढाकाराने तसेच जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था, पनवेल, नायर हॉस्पिटल आणि सुश्रुषा हार्ट केअर सेंटर, स्पेशालिटी हॉस्पिटल व श्री साई ब्लड बँक, पनवेल यांच्या सहकार्याने हे शिबिर राबविण्यात आले होते. हा उपक्रम सर्वत्र आठवडाभर राबविण्यात येणार आहे. त्यामुळे गरजू रुग्णांसाठी हे खूपच लाभदायक ठरत आहे.

## समूहगीत गायन स्पर्धेत खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे सुयश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद नेरूळ खारघर सी.बी.डी. बेलापुर शाखे तर्फे शनिवारी (दि.२) आयोजित राष्ट्रीय चेतना के स्वर समूहगीत गायन स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन नवी मुंबई विभागीय स्पर्धेत, हिन्दी व संस्कृत समूह गीत गायनात प्रथम क्रमांकाचे परितोषिक मिळवून आपल्या शाळेचे नाव रायगड, नवी मुंबईत उज्वल केले. व पुढील प्रांत स्तरावर उपांत्य फेरीसाठी नवी मुंबई रायगड मधून आपली एकच शाळा निवडण्यात आली.





हिन्दी व संस्कृत गीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून आपल्या शाळेच्या शिरपेचात संगीत क्षेत्रात आणखी एक मानाचा तूरा रोवळा. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी काव्या विकास वाळंज, पूर्णा अभिषेक उपाध्याय, राघवी सुभाष नौटीयाल, विस्मया सुभाष काबनूर, कौशिकी बॅनर्जी, समर दिनेश रणशेवरे, वृंदा घनश्याम बोरवणकर, स्मरण प्रशांत गावडे, ईधांत प्रशांत फोडकर, सिद्धार्थ सुधाकर कोळी.

वरील विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे संगीत शिक्षक दत्तात्रय मोकल व मधुकर धोंगडे यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका राज आलोनी यांनी विद्यार्थ्यांचे, नवी मुंबई विभागीय पातळीवर यशस्वी झाल्याबद्दल अभिनंदन करून कौतुक केले.

## वाहनतळातून कारची चोरी

**पनवेल :** खारघर येथील टाटा हॉस्पिटलच्या वाहनतळ आवारात उभी करून ठेवलेली कार अनोळखी व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कार मालकाने दिलेल्या तक्रारीवरून खारघर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. निशिकांत पाटील टाटा हॉस्पिटल, खारघर येथे काम करतात. ते कामावर आले असताना त्यांनी त्यांची कार दवाखान्याच्या परिसरातील वाहनतळावर उभी केली होती. रात्रपाळीचे काम संपून ते सकाळी कार उभी केलेल्या ठिकाणी आले असता, त्यांची कार तेथून गायब असल्याचे त्यांना आढळले. त्यावर त्यांनी सर्वत्र शोधूनही त्यांना कार न सापडल्याने त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करून त्याचा शोध सुरू केल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पनवेल सीकेपी समाजातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू युवा मंच, पनवेल आणि मेडिकव्हर हॉस्पिटल, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी करण्यात आले आहे. मैत्री दिनाचे औचित्य साधून घेतलेल्या आजच्या आपल्या सर्वांसाठी मोफत आरोग्य शिबिराला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

मग मेडिकव्हरच्या टीमने आरोग्य शिबीराची तयारी केली. प्रमुख पाहुण्यांनी फित कापून व स्वतःची आरोग्य तपासणी करून कार्यक्रमाला सुरुवात केली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती लावली आणि शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासोबत भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदी उपस्थित होते. माजी नगरसेविका दर्शना भोईर व पत्रकार बंधू उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. पनवेलचे प्रतिथ यश उद्योजक स्वप्नील गुप्ते हे उपस्थित राहिले व शुभेच्छा दिल्या तसेच त्यानी भावी कार्यक्रमानं बद्दल चर्चा केली.

प्रमुख पाहुणे राजू गुप्ते, डॉ. लिखिते साहेब, श्री कुलकर्णी होते. चित्रे काका यांनी कार्यक्रमाची सुंदर प्रस्तावना केली. सीकेपी समाज पनवेलचे अध्यक्ष योगेश राजे यांनी ऑडिओ क्लिपच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. सीकेपी युवा मंचचे अध्यक्ष तुषार देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सीकेपी युवा मंचच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. सीकेपी युवा मंचचे उपाध्यक्ष रोहित गुप्ते यांनी सर्व मान्यवरांचे, सीकेपी समाज पनवेलचे पदाधिकारी, विश्वस्त व सदस्य या सर्वांचे आभार मानले.

या उपक्रमात ६० पेक्षा जास्त नागरिकांनी ईसीजी सेवा, ८० पेक्षा जास्त नागरिकांनी नेत्र तपासणी सेवा व १६० पेक्षा जास्त नागरिकांनी रक्तदाब तपासणी, ब्लड शुगर तपासणी सेवांचा लाभ घेतला. सर्व स्वयंसेवकांचे आभार तुषार देशपांडे यांनी मानले.

## पनवेलमध्ये शास्त्रीय आणि सुगम संगीताची मैफिल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, नादब्रम्ह साधना मंडळ खारघर आणि पनवेल तालुका सांस्कृतिक सेल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.५) सायंकाळी ०५ वाजता पनवेलमध्ये 'शास्त्रीय व सुगम संगीत सुश्राव्य मैफिल आयोजित करण्यात आली आहे.

या मैफिलीत सायंकाळी ५ वाजता पं. मारुती पाटील (ठाणे) यांचे सतारवादन होणार असून त्यांना तबल्यावर पं. विनायक नाईक (डोंबिवली) यांची साथ लाभणार आहे. त्यानंतर नवदुर्गा महिला प्रासादिक भजन मंडळ कोपरा यांचे संगीत भजन होणार आहे. त्यामध्ये शिवमाला पाटील यांचे गायन होणार असून पखवाजवर निलेश पाटील, तबल्यावर मिलिंद कडू, चालक म्हणून नवदुर्गा महिला भजन मंडळाची साथ संगत असणार आहे. त्यानंतर सायंकाळी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आयोजकांच्या वतीने अभिष्टचिंतन सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक अक्षय चौधरी यांनी केले आहे.



**पनवेल : पनवेल एज्युकेशन सोसायटी संचालित याकूब बेग हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजचे सहाय्यक शिक्षक आबिद मुन्शी आणि तजिन काजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या निवृत्तीनिमित्त हायस्कूल कॅम्पसमध्ये निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल हुसेन काझी अध्यक्षस्थानी, तर उपस्थितांमध्ये माजी नगरसेवक मुकीद काझी व अन्य मान्यवर होते. सत्कारानंतर आबिद मुन्शी यांच्या देशभक्तीपर गीते असलेल्या 'मेरा भारत' या पुस्तकाचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते झाले.**





# लोकसेवेचा तपस्वी

लोकसेवक हा अनेक अंगाने परिपूर्ण असावा लागतो. लोकसेवेचे उद्दिष्ट समोर ठेवून समाधानपूर्वक नेटाने पुढे वाटचाल करणारा, निः स्वार्थपणे जगणारा, लोकांत मिळून मिसळून वागणारा असावा लागतो असे म्हटले जाते! या बाबींचा विचार केल्यास चटकन समोर नाव येते ते पनवेलचे सक्षम, लोकप्रिय आमदार प्रशांतदादा ठाकूर यांचे..! होय ती असामी तशीच आहे.

सुखी आणि समृद्ध कुटूंबात जन्मूनही श्रीमंतीचा आव न आणता सामान्य माणसासारखे जीवन जगत लोकसेवेचे उद्दिष्ट साकार करण्यात सतत व्यस्त असणारा माणूस म्हणून प्रशांतदादांची ख्याती आहे. विद्यालयीन शिक्षणाबरोबर लोकसेवेचा ध्यास असल्याने त्यांनी लोकसेवेचा कळस गाठण्यासाठी राजकारणात उडी घेतली. त्यांच्यामागे वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आशीर्वाद आहे. त्यांनी केलेली लोकसेवा आणि त्यांचा दानशूरपणा जनतेच्या हृदयात कोरला गेला आहे! आज ते 'रायगडचा मसिहा' म्हणून ओळखले जातात.



प्रशांतदादांनी लोकसेवेसाठी समाजकारणाबरोबर राजकारणात प्रवेश करून २००६ साली पनवेल नगर परिषदेची निवडणूक लढवून ते नगर परिषदेचे अध्यक्ष झाले. त्यानंतर ते २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ असे सलग चार वेळा ते महाराष्ट्र विधीमंडळात आमदार म्हणून निवडून गेले. या कार्यकाळात त्यांनी उत्कृष्टपणे कामे केली, लोकांच्या सार्वजनिक गरजा भागविल्या, अडीअडचणी दूर केल्या. उदा. भुयारी गटारे बांधणे, गल्ली–रस्त्यांचे नूतनीकरण, रूंदीकरण, उद्याने–बाग बगीचे सुशोभीकरण, नवनिर्मिती आदी तसेच ठिकठिकाणी जनसंपर्क कार्यालये उभारल्याने परिसरातील कोणतीही व्यक्ती थेट कार्यालयात संपर्क साधून महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, सिडको, पोलीस संबंधित समस्यांचे निवारण करून घेऊ शकतो. यासाठी कार्यालयात उच्च तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विशेष सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. त्याचा लाभ कित्येकांनी घेतला. यामुळे लोकांशी त्यांचे मजबूत संबंध विकसित राहिले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून दरवर्षी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या महिलांच्या सन्मानार्थ विशेष कार्यक्रमाचे आयोजन व त्यांचा सत्कार, मागास प्रभागातील पक्ष कार्यकर्त्यांसाठी महामेळावा, गुरू नानक यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम, ईदनिमित्ताने मुस्लिम बांधवांना शुभेच्छा, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत एक लाख रुपयांच्या सहाय्याने पनवेल धोदाणी येथे अंगणवाडी शाळेचे उद्घाटन, अपघातग्रस्तांना तातडीची वैद्यकीय मदत, महिला बचत गटाची स्थापना व भविष्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन, छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन, रेल्वे भरतीसाठी मार्गदर्शन शिबिर, बेरोजगार युवकांसाठी कार्यशाळेचे आयोजन, पंतप्रधान योजनेतून १०० युवकांना कर्ज मिळवून देण्यास मदत केली. ५५ महिला विकास कक्षाची नोंदणी केली, भटक्या जमातीच्या कुटूंबाला मेंढ्या वितरीत केल्या. पनवेल परिसरातील अनेक कंपन्यातील कामगारांना न्याय मिळवून दिला. शासकीय रुग्णालयातील गैरसोयींविरुध्द आवाज उठवून रुग्ण व कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिला. पनवेलमध्ये उपजिल्हा रुग्णालयाची उभारणी केली. गृहनिर्माण संस्थेच्या इमारतींच्या अडचणी दूर झाल्या.

पनवेल परिसरात राष्ट्रीय महापुरुष व माता यांच्या नावाने सांस्कृतिक केंद्र उभारून ती सुरू करून अभ्यास कक्ष, वाचनालय व सामाजिक–सांस्कृतिक कार्याला आणि कार्यक्रमाला चालना दिली. सहकारी बँकांचे भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर आणून ठेवीदारांना न्याय मिळवून दिला. पनवेल एसटी डेपो सुधारित अवस्थेत आणण्यासाठी आवाज उठवला. झोपडपट्टीवासीयांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाची मागणी अशा असंख्य अशी विधायक कामे करून लोकांच्या हृदयात स्थान निर्माण केले.

उलवे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीसाठी प्रशांतदादांनी जोरदार प्रयत्न केलेच, शिवाय या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव देण्यासाठी प्रखर लढा दिला. सिडकोच्या अध्यक्षपदी असताना लोकांच्या अनेक समस्या सोडवून त्यांना दिलासा दिला. युवा पिढीचा विकास, सक्षमीकरण व प्रशिक्षणावर केंद्रीभूत विशेष कार्यक्रम राबवून युवक विकासाला चालना देण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. शास्त्रशुद्ध स्वरूपाचा दर्जात्मक शिक्षणाचा स्तर, व्यवस्थापन कौशल्ये व मानवी मूल्ये यांच्या सहाय्याने आधुनिक जगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सुसज्ज युवकांना घडविण्यासाठी ते कटिबध्द आहेत. युवकांशी निगडीत आणखी एक महत्त्वपूर्ण क्षेत्र म्हणजे क्रीडा किंवा खेळ. म्हणूनच खेळांच्या सुविधांमध्ये सुधारणा घडवून प्रशांतदादा आवश्यक पावले उचलत आहेत.

महिलांचे संघटीकरण, समन्वय आणि शिक्षणाची गरज, स्वावलंबन व विकास यांच्या गरजेबाबत महिलांमध्ये जागृती निर्माण करणे, सामाजिक न्याय, आर्थिक सबलीकरण व कायदेशीर अधिकारांबाबत जागृती निर्माण करणे. विशेषतः ग्रामीण भागात महिलांमधील नेतृत्व व निर्णय क्षमता आदी गुण ओळखणे आणि त्यांचे सशक्तीकरण करणे. चरितार्थासाठी पर्याय म्हणून त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांना प्रोत्साहन देणे. रोजगार निर्मिताचे मार्ग तसेच लघु उद्योग सुरू करण्यासाठी संभाव्य महिला व्यवसायिकांना आवश्यक प्रशिक्षण देणे तसेच आरोग्य, स्वच्छता व पोषण या संदर्भातील माहिती देणे व आवश्यक प्रशिक्षण देत प्रशांतदादांनी त्यांच्या या विचारांच्या मार्गात वाटचाल केली आहे. आरोग्याबाबत ते म्हणतात, जनतेच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक आरोग्याच्या समस्यांच्या निराकरणासाठी मी कटिबद्ध आहे. विविध आजारांवर मात करण्यासाठी सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील राहीन.



प्रशांतदादांनी लोकसेवा करता करता आपल्या कारकिर्दीत पुरस्कार आणि पदे मिळवून ते गौरवास पात्र ठरले आहेत. भारत सरकारच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय अंतर्गत नेहरू युवा केंद्राकडून दिला जाणारा 'सर्वोत्तम युवा पुरस्कार', साई रत्न फांऊडेशनचा 'युवा गौरव पुरस्कार', योग प्रिय प्रकाशनाचा 'वासुदेव बळवंत फडके पुरस्कार' त्यांना प्राप्त झाला आहे.

हे जे काही लिहिले आहे ते, एका लोकसेवेच्या तपस्व्याचा कार्यभाग म्हणून..! मोह, मत्सर आणि स्वार्थ त्यागून संतासारखे आणि राष्ट्रपुरुषांसारखे लोकांच्या सेवेत मग्न आणि व्यस्त राहून आपले जीवन समाधानी करावे असे मानणाऱ्या देव माणसातील आणखी एक माणूस आमच्यासाठी आहे, हे खरंतर आमचे भाग्यच..! सक्षम, कार्यक्षम, कार्यसम्राट आमदार प्रशांतदादा ठाकूर यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा..!

**–ॲड. प्रकाश बिनेदार,**
**माजी नगरसेवक तथा**
**जिल्हा सरचिटणीस, भाजप उत्तर रायगड**



# राजकारण, समाजकारण आणि संस्कृतीचा संगम

राजकीय नेते अनेकदा विकास, आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षा यांसारख्या मूलभूत गरजांवर लक्ष केंद्रित करतात, पण काही थोर नेते असेही असतात, जे या सर्वांबरोबरच आपल्या शहर तसेच जिल्ह्याच्या कला आणि सांस्कृतिक वारशाला जपण्यासाठीही तितक्याच झपाट्याने कार्य करतात. असेच एक असामान्य नेतृत्व म्हणजेच आपल्या पनवेल नगरीचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, जे केवळ राजकारणात नव्हे, तर सांस्कृतिक जाणीवांमध्येही आपली ठसठशीत छाप सोडतात.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या बोलण्यात नेहमी उल्लेख असतो की आपली संस्कृती हीच आपल्या समाजाची ओळख आहे. ती रुजवणं, वाचवणं म्हणजे आपल्या मूळांशी प्रामाणिक राहणं गरजेचे आहे. त्यांच्या नेतृत्वात पनवेल आणि परिसरात अनेक कला, सांस्कृतिक उपक्रमांना चालना मिळाली आहे.

आजच्या गतिमान आणि तंत्रज्ञ प्रधान युगात प्रशांतदादांनी आपल्या पारंपरिक मूल्यांशी नातं घट्ट ठेवले आहे. त्यांच्या दृष्टिकोनामुळेच त्यांच्या मतदारसंघातच नव्हे; तर राज्यभरात त्यांना एक संवेदनशील आणि अभ्यासू नेता म्हणून ओळखलं जातं. राजकारण आणि संस्कृती यांची सांगड घालणं ही एक अवघड गोष्ट असते, पण प्रशांतदादा यशस्वीपणे दोनही क्षेत्रांमध्ये समतोल राखून काम करत आहेत. अशा व्यक्तिमत्वांकडून प्रेरणा घेणं ही आपली सामाजिक जबाबदारी आहे, कारण जो समाज आपल्या संस्कृतीचा आदर करतो, तोच खऱ्या अर्थाने समृद्ध आणि सशक्त होतो. राजकीयदृष्ट्या जबाबदारी सांभाळत असताना आमदार प्रशांत ठाकूर रंगभूमीवरील नवोदित कलाकारांना प्रोत्साहन मिळावे यासाठीदेखील प्रयत्नशील असतात. त्यांचे कार्यालय केवळ राजकीय चर्चांसाठीच नव्हे; तर कलाकारांच्या समस्या, प्रश्न, नवनवीन उपक्रमांच्या सादरीकरणासाठीही खुले असते. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणं, लोककलांचे जतन, शाळा–कॉलेजमध्ये कला शिक्षण अनिवार्य करणं आणि सातत्याने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणं यासारख्या अनेक बाबींचा उल्लेख करता येईल. त्यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या अनेक उपक्रमांमध्ये दरवर्षी नवनवीन कलावंत जोडले जात आहेत आणि उपक्रमांची नावं घ्यावी तितकी कमी पडतील, पण तरीही त्यापैकी गेली नऊ वर्ष हाऊसफुल्ल होणारी आणि अतिशय भव्य आणि दिग्गजांनी गाजवलेली 'दिवाळी पहाट', गेली १२ वर्ष भरवली जाणारी आणि तरुणाईच्या मनावर अधिराज्य करणारी 'राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा', कोरोना काळानंतर प्रेक्षकांची सांस्कृतिक भूक भागविणारे 'मनोरंजन अनलॉक'चे कार्यक्रम, कोशिश फाउंडेशनच्या माध्यमातून शास्त्रीय, उपशास्त्रीय गाण्यांची मैफिल 'सूर पनवेलचा', पनवेलकरांसाठी सातत्याने विनामूल्य आयोजित केला जाणारा 'नाट्य महोत्सव', खारघरमधील 'भाजप सांस्कृतिक महोत्सव' यामध्ये आपली खाद्य संस्कृती दर्शवणारा मे महिन्यात झालेला मिसळ महोत्सव, आंबा महोत्सव, शस्त्र प्रदर्शन, महाराष्ट्राची महासंस्कृती..., त्यानंतर अतिशय दिमाखदार असा तीन दिवसीय 'कीर्तन महोत्सव', गेली दोन वर्ष सुधीर फडके यांच्या अजरामर गीतांचा समावेश असणारा गाण्यांचा कार्यक्रम 'बाबूजी महोत्सव', अनेक वर्ष चालू असलेली आपली सांस्कृतिक ठेवा असणारी राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय 'दिवाळी अंक स्पर्धा', गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या विविध दर्जेदार मैफिली 'मेरी आवाज ही पेहचान हे', पनवेल तसेच रायगड जिल्ह्यातील होतकरू अभिनेता व अभिनेत्रींसाठी भरवली जाणारी 'जिल्हास्तरीय एकपात्री–द्वीपात्री स्पर्धा', अनेक दिग्गज वक्त्यांचे मार्गदर्शन मिळण्याच्या हेतूने वेळोवेळी आयोजित केली जाणारी 'व्याख्यानमाला', संपूर्ण महाराष्ट्रभर गाजलेली छत्रपती शिवरायांवरील शक्ति आणि स्फूर्तिगीतांची 'शिवगान स्पर्धा', देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'नमो लघुपट स्पर्धा', गुरूपौर्णिमा तसेच आषाढी एकादशीनिमित्त आयोजित 'भेटला विठ्ठल माझा' हा अभंग भक्ती संगीताचा कार्यक्रम हे आणि असे इतर अनेक कार्यक्रम हे प्रशांतदादांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले जातात.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या आशीर्वादाने प्रशांतदादा ठाकूर आणि परेशदादा ठाकूर यांच्या माध्यमातून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, भारतीय जनता पक्ष– सांस्कृतिक प्रकोष्ठ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, कोशिश फाऊंडेशन या सर्व संस्थांमार्फत वर्षभर सांस्कृतिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते.

या व्यतिरिक्त अनेक नाट्य निर्माते तसेच कला क्षेत्रातील विविध प्रकारचे कार्यक्रम घेणाऱ्या संस्थांना प्रशांतदादा हे आर्थिक पाठबळ देत असतात. त्यातूनच अनेक कलाकार, रंगकर्मी आणि सोबतच सामान्य नागरिकही सोबत जोडले जातात.

आज ज्या वेगाने जग पुढे जात आहे, तिथे विकास म्हणजे फक्त रस्ते, पूल, स्मार्ट सिटी, उद्योग यापुरताच मर्यादित राहिलेला नाही. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच, जो आपल्या सांस्कृतिक मुळांशी नातं तोडत नाही आणि हीच जाण ठेवून प्रशांतदादा कार्य करीत आहेत. ते आपल्या राजकीय कार्यात सामाजिक, आर्थिक, आणि शैक्षणिक विकासासोबतच सांस्कृतिक क्षेत्रालाही केंद्रस्थानी ठेवतात, हे विशेषत्वाने जाणवते.

२०१४पासून ते आज म्हणजेच गेली ११ वर्षे प्रशांतदादांसोबत काम करण्याची संधी मला मिळाली, ज्यामधून खूप काही शिकता आले आणि यापुढेही अनेक गोष्टी अजून शिकायच्या आहेत. दादा तुम्हाला माझ्या व माझ्या कुटुंबाकडून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! शतायुषी व्हा!

**–अभिषेक पटवर्धन,**
**अध्यक्ष, भाजप सांस्कृतिक सेल, उत्तर रायगड जिल्हा**

# समाजसेवी लोकप्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील एक कर्तृत्ववान लोकप्रतिनिधी म्हणून ज्यांनी आपली ओळख आज संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण केली आहे ते म्हणजे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रशांतदादा ठाकूर यांचा आज ५ ऑगस्ट रोजी वाढदिवस. सुरुवातीलाच त्यांना भारतीय जनता युवा मोर्चा दक्षिण रायगडतर्फे वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो...

आमदार प्रशांतदादा ठाकूर हे रायगड लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार तथा प्रसिद्ध समाजसेवक रामशेठ ठाकूर यांचे सुपुत्र. आदरणीय रामशेठ आणि दादांनी पनवेल तालुक्यातच नव्हे; तर रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या कार्याचा प्रभाव पाडला आहे. त्यांची उच्च विचारसरणी, सामाजिक, शैक्षणिक, सहकार, क्रीडा आदी क्षेत्रातील योगदान वाखाणण्याजोगे आहे. गोरगरीब जनतेचे ते आधारस्तंभ आहेत. अनेकांना त्यांनी रोजीरोटीला लावून गोरगरीब जनतेचे आशीर्वाद घेतले आहेत. वडिलांचा आदर्श नजरेसमोर ठेवून आमदार प्रशांतदादा ठाकूर हे आज बहुजन समाजात बांधिलकी व जातीय सलोखा राखून समाजकार्य करीत आहेत. राजकारण करीत असताना ८० टक्के समाजकारण व फक्त २० टक्के राजकारण करताना त्यांनी समाजातील विविध घटकांना न्याय मिळवून देण्याबरोबरच बहुजन समाजाचे प्रश्न, समस्या सोडविण्यावर नेहमीच भर दिला आहे.



मितभाषी, शांत व संयमी स्वभावाचे व्यक्तिमत्व असलेले प्रशांतदादा ठाकूर हे वडिलांचे पाठबळ, जनतेचा आशीर्वाद आणि आपल्या कार्यकर्तृत्वावर पनवेल विधानसभा मतदारसंघातून सलग चार वेळा निवडून येऊन आमदार झाले आहेत. लोकप्रतिनिधी या नात्याने विधीमंडळात आवाज उठवून विविध प्रश्न, समस्या अभ्यासपूर्णपणे व पोटतिडकीने मांडून त्यांनी आपल्या मतदारसंघाचा सर्वांगीण, सुंदर असा विकास साधला आहे. एक उत्तम वक्ता म्हणूनही त्यांची ख्याती आहे.

रायगड जिल्ह्यातील तरुणांना संघटित करून आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी जिल्ह्यात भाजपची संघटना मजबूत केली आहे. आपल्याकडे आलेल्या लोकांची कामे झाली पाहिजेत, त्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत या उदात्त भावनेतून ते समाजात काम करीत आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल आदराची भावना जनतेच्या मनात आहे.

आपला जन्मदिवसही हा विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा व्हावा असे प्रशांतदादा ठाकूर यांना वाटते. वृत्तपत्रात जाहिरात देणे, बॅनरबाजी करणे यापेक्षा वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविले तर त्याचा फायदा समाजातील गोरगरीब जनतेला होईल हा विचार करून त्यांनी पनवेलमध्ये महारोजगार मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला मोठा प्रतिसाद लाभून हजारोंच्या संख्येने सुशिक्षित बेरोजगार तरुण मुला–मुलींना त्याचा लाभ मिळाला. हाच खरा आपला जन्मदिवसाचा आनंद व शुभेच्छा असल्याचे ते सांगतात.

आमदार प्रशांतदादा ठाकूर यांचे सर्वच क्षेत्रात काम असून एक आदर्श आमदार, कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी म्हणून त्यांच्याकडे आज बहुजन समाजातील बांधव पाहत आहेत. त्यांचे सामाजिक व राजकीय कार्य असेच पुढे बहरत जाऊन भविष्यात ते मंत्री होऊन रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री व्हावेत याच त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**–निलेश थोरे, जिल्हाध्यक्ष,**
**भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड**

# गोरगरिबांचा आधारवड

भारतीय जनता पक्षाच्या रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचे आधारस्तंभ आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्यासोबत मी २००४ सालापासून त्यांचा कार्यकर्ता म्हणून काम करत आहे. त्यांच्यासारखा राजकारणातील देवमाणूस मी आजतागायत पहिला नाही.

आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्याकडे गेलेली कुठल्याही पक्षाची व्यक्ती रिकाम्या हाताने कधीही परत परत आलेली नाही. प्रशांतदादा आज पनवेलसह रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचे काम करत आहेत. वरिष्ठ नेत्यांकडून जी काही जबाबदारी प्रशांतदादांना दिली जाते, ती जबाबदारी ते समर्थपणे पार पाडतात. त्यांनी आपल्या कार्यपद्धतीने छाप टाकलेली आहे. पनवेल येथील एका कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रशांतदादांच्या खांद्यावर हात ठेवून शाब्बासकीदेखील दिली होती.

मी प्रशांतदादांकडे नागोठणे परिसरातील जनतेच्या अडीअडचणी घेऊन जातो तेव्हा ते तत्काळ त्या सोडवित असतात. विकासकामांसाठी निधीही उपलब्ध करून देतात. शिक्षणाचा प्रश्न, दवाखान्याचा प्रश्न, बेरोजगारांचा प्रश्न वा इतर सर्वसामान्य जनतेचे विविध प्रश्न ते नेहमीच सोडवत असतात. त्यांच्या डिक्शनरीत 'नाही' हा शब्दच नाही.



प्रशांतदादा माझ्यावर जेव्हा जेव्हा एखादी जबाबदारी देतात तेव्हा तेव्हा मीदेखील ती जबाबदारी निष्ठेने पार पाडत आलेलो आहे. रायगड जिल्हा भाजपचे अध्यक्ष झाल्यानंतर प्रशांतदादांनी तळागाळातील कार्यकर्त्यांच्या स्वतः जाऊन भेटीगाठी घेतल्या, त्यांच्या पक्षाबाबत अडीअडचणी समजावून घेतल्या. कार्यकर्त्यांच्या व त्यांच्या गावातील समस्या समजावून घेतल्या. हळूहळू समस्या सोडविण्यावर भर देऊन आपला व आपल्या गावाचा खरा विकास आमदार प्रशांतदादा ठाकूरच करू शकतील हा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये व ग्रामस्थांमध्ये निर्माण करण्यास ते यशस्वी झाले. नागोठणे गावातील व आमच्या मुस्लिम मोहल्ल्यातील काही समस्या मी प्रशांतदादांकडे घेऊन गेलो, त्यांनी मला निराश केले नाही. त्यांनी वेळोवेळी नागोठण्यासाठी भरघोस निधी देऊन माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांची मने जिंकली.

रायगड जिल्ह्यात खऱ्या अर्थाने भाजप वाढला असेल तर कार्यसम्राट आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या कार्यतत्पर भूमिकेमुळे असे माझे ठाम मत आहे. एक आदर्श आमदार, नेता कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रशांतदादा आहेत. जसा रायगड जिल्ह्याच्या विकासामध्ये त्यांचा सहभाग आहे तसाच महाराष्ट्राच्या विकासामध्येदेखील त्यांचा महत्त्वाचा सहभाग असून भविष्यामध्ये प्रशांतदादा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात एक अभ्यासू नेतृत्व म्हणून पुढे येणार आहेत याबाबत काडीमात्र शंका नाही.

प्रशांतदादा यांच्याकडे प्रशासकीय ज्ञान उत्तम प्रकारे असल्यामुळे शासकीय अधिकारी त्यांना टरकून असतात. एखाद्या कार्यकर्त्याचे शासकीय कार्यालयात काम असेल, तर प्रशांतदादांच्या एका फोनवर संबंधित अधिकारी त्या कार्यकर्त्याचे काम करतात. काम करताना वा अडचणी सोडविताना प्रशांतदादा कधीही पक्षीय भेदभाव करीत नाहीत. त्यामुळेच रायगड जिल्ह्यातील जनता प्रशांतदादांवर जीवापाड प्रेम करते. आमचे मुस्लिम बांधवांचेदेखील प्रशांतदादांवर विशेष प्रेम आहे. प्रशांतदादा हे खरोखरच गोरगरिबांचे आधारवड आहेत. आज त्यांचा वाढदिवस आहे. जनतेच्या सेवेसाठी अल्लाने प्रशांतदादांना उदंड व निरोगी आयुष्य द्यावे हीच वाढदिनी प्रार्थना.

**–सिराज पानसरे,**
**ज्येष्ठ भाजप कार्यकर्ते, नागोठणे**